# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ३० जुलै, २०१५ / श्रावण ८, १९३७ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) महसूल, पूनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री**<br>**(२) परिवहन मंत्री**<br>**(३) ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६४**

---

**राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील देवस्थान इनामाच्या जमिनी वहिवाटदारांच्या नावावर करण्याबाबत**

**(१) * ७१९६ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) या तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागात अनेक जमिनींची देवस्थान इनाम जमिनी म्हणून नोंद करण्यात आलेली असून या जमिनीवर अनेक रहिवाशी मागील कित्येक वर्षापासून वहिवाट करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रहिवाशांना सदर जमिनीवर मालकी हक्क दिला नसल्यामुळे राहत्या घराची दुरुस्ती अथवा इतर काही सोयी करण्यासाठी परवानगी मिळत नसल्यामुळे ही घरे मोडकळीस येऊन धोकादायक झाली असल्याने रहिवाशांच्या जीवाला धोका निर्माण झाला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या देवस्थान इनाम म्हणून नोंद झालेल्या जमिनी वहिवाटदारांच्या नावावर करण्याबाबत व त्यांना जमिनीचा मालकी हक्क मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) देवस्थान जमिनी अहस्तांतरणीय आहेत. त्यावरील वहिवाटदारांना घर दुरूस्तीसाठी परवानगी आवश्यक असल्यास संबंधित देवस्थानाकडून नाहरकत दाखला प्राप्त झाल्यावर संबंधित ग्रामपंचायतीकडून सदर ठिकाणी घर दुरूस्तीसाठी परवानगी दिली जाते. अशा परवानगी अभावी देवस्थान जमिनीवरील घर मोडकळीस आल्यामुळे रहिवाश्यांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे असे निदर्शनास आले नाही. देवस्थान ईनाम जमिनी संदर्भात शासनाने अभ्यास समिती नेमली होती. सदर अभ्यास समितीचा अहवाल प्राप्त झाला असून सदर अहवालाची छाननी सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोयाबीनच्या बोगस बियाणांची विक्री करून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२) * ७१४२ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सोयाबीन बियाणांचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले असता चार कंपन्यांच्या बियाणांमध्ये उगवण क्षमता ५० टक्केपेक्षा कमी असल्याचा अहवाल प्रयोगशाळेने कृषी विभागाला दिला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बोगस बियाणे देऊन शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या चार कंपन्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) राज्यातील बीज परिक्षण प्रयोगशाळेत तपासणीसाठी प्राप्त झालेल्या सोयाबीन बियाणांच्या नमुन्यांपैकी काही नमुने ५०% पेक्षा कमी उगवण क्षमतेचे असल्याचे निदर्शनास आलेले आहे.
(२) कमी उगवण क्षमतेच्या अप्रमाणित बियाण्यांप्रकरणी बियाणे नियंत्रण आदेश १९८३ मधील तरतूदीनुसार कायदेशीर कारवाई चालू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**दुधावरील कमिशन वाढवून देण्यासाठी मुंबई-ठाणे दूध विक्रेत्यांनी दूध विक्रीवर बेमुदत बहिष्कार टाकल्याबाबत**

**(३) * ८१८५ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुधावरील कमिशन दहा टक्के वाढवून दयावे या मागणीसाठी शहरातील दूध विक्रेत्यांनी गोकुळ, महानंदा, वारणा, अमूल आणि मदर डेअरी या पाच दूध कंपन्याच्या दूध विक्रीवर बेमुदत बहिष्कार टाकण्यात आल्याने मुंबई-ठाणे शहरातील अनेक भागात या कंपन्यांच्या दूधाचा पुरवठा झाला नसल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त दूध कंपन्या कमिशन वाढवून देत नसल्यामुळे दूध विक्रेत्यांचे नुकसान होत आहे तसेच दूध ग्राहकांचीही गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दूध विक्रेत्यांच्या बहिष्कारामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) एप्रिल, २०१५ मध्ये ठाणे जिल्हा व परिसरातील गोकुळ, महानंद, वारणा, अमूल व मदर डेअरी या पाच दूध कंपन्यांच्या दूध विक्रीवर बहिष्कार टाकल्याने या कंपन्यांच्या दुधाचा पुरवठा कमी प्रमाणात झाला ही बाब निदर्शनास आली हे खरे आहे.

(२) विक्रेते त्यांना सोयीस्कर अशा इतर ब्रँडचे दूध विक्री करीत असल्याने विक्रेत्यांचे नुकसान झालेले नाही. तसेच बाजारपेठेत पुरेशा प्रमाणात अन्य ब्रँडचे दूध उपलब्ध असल्यामुळे ग्राहकांची गैरसोय झाली नाही.

(३) व (४) विक्रेत्यांचे कमिशन ठरविणे ही बाब वितरक व दूध पुरवठादार कंपनी यांचेशी संबंधित असून हा प्रश्न त्यांच्यात परस्पर सामंजस्याने सुटल्याने शासनास हस्तक्षेप करण्याचा प्रश्न उद्भवला नाही.

-----------------

## वैरागड (ता.चिखली, जि.बुलढाणा) व खामगांव तालुक्यातील शिवारात टॉवर उभारणी केलेल्या जमिनींचा मोबदला मिळण्याबाबत

**(४) * ८१५३ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैरागड (ता.चिखली, जि.बुलढाणा) व खामगाव तालुक्यातील शिवारात महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण व ट्रान्समिशन (महावितरण) कंपनी करीता महाराष्ट्र ईस्टर्न ग्रीड पॉवर ट्रान्समिशन कंपनी प्रा.लि., औरंगाबाद यांनी टॉवर उभारण्याचे काम सुरु केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिवारातील शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीत टॉवर उभारल्याबाबत ठरलेल्या करारप्रमाणे मोबदला देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोबदला न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांनी टॉवरचे काम थांबविण्याचे प्रयत्न केल्यामुळे त्यांना कंपनीच्या काही अधिकाऱ्यांनी तसेच पोलीस अधिकाऱ्यांनी जबरदस्ती करुन शेतकऱ्यांना त्यांच्या शेतातून धक्के मारुन काढून दिल्याबाबत पोलीस विभागाकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांच्या जमीनीचा ठरल्याप्रमाणे मोबदला न देता जबरदस्ती करुन तसेच स्थानिक पोलीसांची मदत घेऊन जमिनी बळकावणाऱ्या महाराष्ट्र ईस्टन ग्रीड पॉवर ट्रान्समिशन कंपनी प्रा.लि., औरंगाबाद या कंपनीच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महाराष्ट्र ईस्टर्न ग्रीड पॉवर ट्रान्समिशन कंपनीतर्फे बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यातील वैरागड व खामगाव तालुक्यातील शिवारात टॉवर उभारणीचे काम पूर्ण झाले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**परभणी जिल्हयातील शेतकऱ्यांना अनुदान वाटपापासून वंचीत ठेवल्याबाबत**

**(५) * ७२६० श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील शेतकऱ्यांना वाटप करण्यात येणारे अनुदान परभणी, सोनपेठ, मानवत, सेलू व जिंतूर येथील तहसीलदार, तलाठी व इतर यंत्रणांच्या अकार्यक्षमतेमुळे वाटपा अभावी शासनास जमा झाल्याची तक्रार सामाजिक कार्यकार्त्यांनी प्रधान सचिव (महसूल विभाग) यांच्याकडे सन २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अकार्यक्षम तहसीलदार व तलाठी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

मा.मंत्री (महसूल)/प्रधान सचिव महसूल यांचेकडे सामाजिक कार्यकर्त्यांनी दुष्काळ अनुदानाविषयी तक्रारी केल्या आहेत. शेतकऱ्यांचे बँक खाते उपलब्ध झाले नसल्यामुळे व तांत्रिक कारणामुळे अनुदान समर्पित करावे लागले.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**माळीण (ता.आंबेगाव, जि.पुणे) या गावाचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(६) * ७७८० श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयवंतराव जाधव, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.अनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळीण (ता.आंबेगाव, जि.पुणे) या गावात गतवर्षी मुसळधार पावसाने डोंगराचा कडा कोसळून ४४ घरे गाडली जावून १५१ ग्रामस्थ मृत्यूमुखी पडल्याची दुर्घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुर्घटनाग्रस्त ७२ कुटुंबाचे मौ. अडिवरे आणि कशाळवाडी येथे तात्पुरते पुनर्वसन करण्याचे व त्यासाठी सुमारे ६ कोटी १९ लाख रुपये किंमतीच्या निविदा काढण्यात आल्या असल्याचे दिनांक ३ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने त्याकरिता त्वरित निधी उपलब्ध करुन द्यावा, म्हणून पुणे जिल्हा प्रशासनाने दिनांक ४ फेब्रुवारी, २७ एप्रिल आणि दिनांक ३ जून, २०१५ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे वेळोवेळी मागणी केलेली असून शासनाकडून अद्याप निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला नसल्याचेही त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरचे पुनर्वसन करण्यासाठी आदिवासी विकास विभागाने निधी द्यावयाचा कि मदत व पुनर्वसन विभागाने द्यावयाचे, याबाबत शासन स्तरावर एकमत न झाल्याने, निधी उपलब्ध करुन देण्यात आला नसल्याचेही त्याचसुमारास (माहे जून, २०१५) निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व त्यामध्ये काय आढळून आले व त्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे.

(२) नाही. सदर दुर्घटनाग्रस्त ८० कुटूंबांचे मौजे अडिवरे आणि कशाळवाडी येथे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्याचे निश्चित केले होते परंतु तेथील ग्रामस्थांनी नकार दिल्याने मौजे आमडे ता.आंबेगाव येथील जागा निश्चित केली आहे. त्याचे खरेदीखत झाले असुन सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांचेमार्फत रुपये ४,२६,७४,१७२/- ची निविदा अंतीम टप्प्यात आहे.

(३) सन २०१४-२०१५ च्या आर्थिक वर्षात खर्च होईल इतका रुपये ९५,२५,०००/- चा निधी उपलब्ध करण्यात आला असून उर्वरीत निधी त्वरित उपलब्ध करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बीड जिल्ह्यात वीज वितरण कंपनी (महावितरण) मधील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(७) * ७४८३ श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील वीज वितरण कंपनी (महावितरण) मध्ये कार्यकारी अभियंत्यासह इतर अधिकारी व कर्मचारी यांची पदे मोठया प्रमाणावर रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणमधील रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री ऊर्जा यांच्याकडे दिनांक २० मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरणाकडून नविन भरती केलेले कनिष्ठ अभियंते वेगवेगळया कारणास्तव नोकरी सोडून जात असल्यामुळे बीड जिल्ह्यातील कनिष्ठ अभियंत्यांची पदे मोठया प्रमाणावर रिक्त राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, किमान पाच वर्ष अनुभव असलेल्या अधिकाऱ्यांची नियुक्ती बीड जिल्ह्यात करुन जिल्ह्यातील रिक्त पदे भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कुक्कुटपालन संस्थांकडील थकबाकी वसुलीसाठी**
**वनटाईम सेटलमेंट कराराच्या प्रस्तावाबाबत**

**(८) * ७९५८ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रामराव वडकुते, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सहकार कायद्यातील तरतूदीनुसार ७३ सहकारी कुक्कुटपालन संस्थांची जिल्हा पातळीवर सहाय्यक निबंधकाकडे नोंदणी झालेल्या संस्थांपैकी सध्या केवळ २० संस्था सुरु असून २७ संस्था बंद तर २३ संस्था अवसायानात काढल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) उक्त कुक्कुटपालन संस्थांकडे शासनाची १२४ कोटीहून अधिक थकबाकी असून वसुलीसाठी वनटाईम सेटलमेंट करार करण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त, पशुसंवर्धन विभाग यांनी शासनाला पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) बंद असलेल्या २७ कुक्कुटपालन संस्थामध्ये शासनाची किती रक्कम गुंतली आहे व सदर रक्कम वसुल करण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

राज्यातील ७३ राष्ट्रीय सहकार विकास निगम पुरस्कृत सहकारी कुक्कुट पालन संस्थांपैकी १६ संस्था सुरु, २९ संस्था बंद, २५ संस्था अवसायनात असून ३ संस्था कर्जमुक्त झालेल्या आहेत.

(२) होय.

(३) सदरचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) बंद पडलेल्या २९ संस्थांमध्ये शासनाची रु. ६१.२९१ कोटी रक्कम थकीत आहे. सदर संस्थांकडील वसूलीकरीता सहकारी विभागाकडून, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील तरतुदींचा अवलंब करुन रकमेची वसूली करणेची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना राष्ट्रीय कृषी विमा योजनेअंतर्गत मंजूर झालेला निधी वितरीत करण्याबाबत

**(९) * ६६८७ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय कृषी विमा योजने अंतर्गत खरीप हंगाम सन २०१४-१५ मध्ये ४५ लक्ष शेतकऱ्यांपैकी केवळ ३५ लक्ष शेतकऱ्यांना विमा रक्कम माहे मे, २०१५ मध्ये वा त्यासुमारास मंजूर झाली आहे, हे खरे आहे का,

(२) असल्यास, दुष्काळी भागातील उर्वरित शेतकऱ्यांना विमा मंजूर न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शेतकऱ्यांचे पीक विमा योजनेचे ६५० कोटी रूपये थकित असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर पिक विम्याचे ६५० कोटी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, विमा कंपनीने शेतकऱ्यांना मंजूर केलेली रक्कम माहे जून, २०१५ पूर्वी वितरीत करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, याबाबत विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत खरीप हंगाम २०१४ मध्ये राज्यातील ४४.७९ लाख शेतकऱ्यांनी रक्कम रुपये १७६.२४ कोटी विमा हप्ता भरुन २८.०५ लाख हेक्टर क्षेत्र विमा संरक्षीत केले होते. त्यापैकी ३४.८७ लाख शेतकरी नुकसान भरपाईस पात्र ठरले असून त्यांना रुपये १५९५.६५ कोटी नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत मंजूर करण्यात आलेली आहे.
(२) राष्ट्रीय कृषि विमा योजना रब्बी १९९९-२००० पासून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार राज्यात क्षेत्र हा घटक (Area Approach) धरुन सुरु करण्यात आली आहे. सदर योजना केंद्र शासनाने स्थापन केलेल्या भारतीय कृषि विमा कंपनी मार्फत राज्यात राबविण्यात येते.

या योजनेअंतर्गत नुकसान भरपाई निश्चित करतांना पैसेवारी, दुष्काळ, टंचाई परिस्थिती आणि पुरामुळे झालेल्या नुकसानीसंदर्भात कोणत्याही शासकीय विभाग/संस्थेमार्फत घोषित करण्यात आलेली आकडेवारी ग्राह्य धरण्यात येत नसुन महसुल मंडळ/तालुकास्तरावर घेण्यात येणाऱ्या पीक कापणी प्रयोगांवर आधारित सरासरी उत्पन्न व उंबरठा उत्पन्न यांची तुलना करुन सरासरी उत्पन्न उंबरठा उत्पन्नापेक्षा कमी आल्यास कमी आलेल्या उत्पन्नाच्या आधारे भारतीय कृषि विमा कंपनी मार्फत नुकसान भरपाई निश्चित करण्यात येते. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत अधिसूचित पिकासाठी उंबरठा उत्पन्नापेक्षा कमी उत्पन्न आलेल्या अधिसूचित क्षेत्रासाठी नुकसानीच्या प्रमाणात भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत नुकसान भरपाई निश्चित करण्यात आली आहे.
(३) व (४) राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत खरीप २०१४ अंतर्गत रक्कम रुपये १५९५.६५ कोटी नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत मंजूर करण्यात आलेली आहे. त्यापैकी राज्य हिस्सा नुकसान भरपाईची पुर्ण रक्कम रुपये ६९०.७४ कोटी असून सदर रक्कम शासनामार्फत दिनांक १० व १७ जून, २०१५ रोजी भारतीय कृषि विमा कंपनीकडे वर्ग करण्यात आलेली आहे.

(५) राज्य हिस्सा नुकसान भरपाईची रक्कम रुपये ६९०.७४ कोटी राज्य शासनामार्फत भारतीय कृषि विमा कंपनीकडे वर्ग करण्यात आली आहे. भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत सदरची रक्कम संबंधीत बँकाकडे वर्ग करण्यात आलेली असून संबंधीत बँकामार्फत शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कोरड्या दुष्काळाबाबत शासनाकडून आलेली मदत बँकेत खाती नसल्यामुळे मिळाली नसल्याबाबत**

**(१०) * ७८९८ श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक शेतकऱ्यांचे बँकेत खाते नसल्यामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी शासनाने वितरीत केलेल्या निधीतील जवळपास पाचशे कोटी रुपयांची मदत सरकारकडे पडून असल्याची धक्कादायक बाब माहे एप्रिल, २०१५ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यवतमाळ जिल्ह्यातील ४१ हजार शेतक-यांना कोरड्या दुष्काळाबाबत शासनाकडून आलेली मदत शेतक-यांची बँकेत खाती नसल्याने २३ कोटी रुपयांची मदत शासनाकडे जमा करण्यांत आल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या तिस-या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर मदत शेतक-यांना तातडीने मिळावी म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप, कोणतीच मदत केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
यवतमाळ जिल्ह्यातील सुमारे २४ हजार शेतकऱ्यांची बँक खाती नसल्याने निधी समर्पित झाला आहे.
(३), (४) व (५) बँकेत खाती नसल्याच्या व तांत्रिक कारणास्तव बाधित शेतकऱ्यांना वाटप करावयाचा निधी शासनाने दि. ८ जुलै, २०१५ रोजी वितरीत केला असून तो शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्याची कार्यवाही प्रगती पथावर आहे.

-----------------

## यवतमाळ जिल्हयात शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचे आरोग्य सुधार कार्यक्रमाअंतर्गत मृद आरोग्य पत्रिका अभियान राबविण्याबाबत

**(११) * ७८७१ श्री.संदिप बाजोरिया, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्वाधिक शेतकरी आत्महत्याग्रस्त, नक्षलग्रस्त व आदिवासी बहुल यवतमाळ जिल्हयात सॉईल हेल्थ कार्ड योजना तसेच शेतकऱ्यांच्या जमिनीचे अहवाल तयार झालेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचे आरोग्य सुधार कार्यक्रमांतर्गत मृद आरोग्य पत्रिका अभियान राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) यवतमाळ जिल्हयात माती परिक्षण प्रयोगशाळा असून त्याठिकाणी अत्यंत कमी प्रमाणात अधिकारी/कर्मचारी असून अपूरा निधी दिला असल्यामुळे योजनेला पाहिजे असलेली गती अद्यापही आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांची प्रलंबित असलेली कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

सन २०११-१२ ते २०१४-१५ पर्यंत यवतमाळ जिल्हयात ३५९१० मृद नमुन्यांचे विश्लेषण पुर्ण झाले असुन, २४६६५ मृद आरोग्य पत्रिका वितरीत करण्यात आलेल्या आहेत.

(२) होय.

(३) हे खरे नाही.

(४) केंद्र व राज्य शासनाच्या सहयोगाने सुरु करण्यात आलेल्या मृद आरोग्य पत्रिका अभियांनांतर्गत सन २०१५-१६ या प्रथम वर्षाच्या नियोजनाप्रमाणे १७७६० मृद नमुने काढण्याचे लक्षांक निर्धारीत करण्यात आले असून माहे जून अखेर ९९६३ मृद नमुने काढण्यात आलेले आहेत. सदर नमुन्यांची तपासणी करणे व शेतकऱ्यांना आरोग्य पत्रिकेचे वितरण करणे याबाबतची कार्यवाही चालू आहे. जिल्हयातील मृद चाचणी प्रयोगशाळेच्या क्षमतेपेक्षा जास्त असलेले मृद नमुने, इतर नोंदणीकृत अशासकीय मृद चाचणी प्रयोगशाळांकडे पाठवून, त्यांची तपासणी करुन घेण्याची कार्यवाही चालू आहे.

-----------------

## "महानंद" दुध डेअरीत झालेला गैरव्यवहार

**(१२) * ८३११ श्री.महादेव जानकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक ४२४९ ला दिनांक १७ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानंद दुध डेअरीत शेकडो कोटी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार नुकताच निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानंद दुध संघाने जवळ नसताना ८० कोटी रुपये खर्चुन दुध भुकटी प्रकल्प उभा केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत भुकटी प्रकल्पाची स्थिती काय आहे,

(४) महानंद दुध डेअरीत शेकडो कोटीचा गैरव्यवहार करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्यापि, कारवाई करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) महाराष्ट्र राज्य सहकारी दुध महासंघ मर्या, महानंद गोरेगाव (पूर्व) यांचे सन २००९-१० व सन २०१०-११ या कालावधीच्या लेखापरिक्षणामधील आक्षेपांबाबत सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अंतर्गत चौकशी करण्याचे आदेश दि. ०५/०१/२०१५ रोजी निर्गमित केले असून चौकशीची प्रक्रिया सुरु आहे.

(२) होय.

(३) सद्य:स्थितीत दुध भुकटीला बाजारात अजिबात मागणी नसल्याने दुध भुकटी प्रकल्प बंद ठेवावा लागत आहे. याबाबत संचालक मंडळास जबाबदार धरुन त्यांच्या विरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७८ अन्वये चौकशी करण्याचे आदेश सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) यांनी दि. २४/०३/२०१५ रोजी निर्गमित केले आहेत.

(४) व (५) या प्रकरणी सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) यांनी दि. ०५/०१/२०१५ व दि. २४/०३/२०१५ रोजी चौकशी करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. सद्य:स्थितीत चौकशीची प्रक्रीया सुरु असून विलंब झालेला नाही.

-----------------

## दाभोळ (जि.रत्नागिरी) येथील बंद पडलेला वीज प्रकल्प पुन्हा सुरु करण्याबाबत

**(१३) * ७५५१ ॲड.निरंजन डावखरे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नैसर्गिक वायुअभावी बंद पडलेल्या दाभोळच्या रत्नागिरी गॅस ॲड पॉवर प्रा.लि. (आरजीपीपीएल) वीज प्रकल्पाच्या महाराष्ट्राकडे असलेल्या थकबाकीचे रुपांतर थकीत कर्जाऐवजी समभागात करण्यास सरकारने परवानगी दिली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या दीड वर्षापासून दाभोळ (जि.रत्नागिरी) येथील बंद पडलेला (रत्नागिरी गॅस ॲन्ड पॉवर प्रकल्प) वीजप्रकल्प दिनांक १ जून, २०१५ पासून सुरु करण्यात येणार असल्याचे दिनांक १२ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय मालमत्ता असलेला दाभोळ प्रकल्प भविष्यात खासगी कंपनीच्या हातात जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर वीजप्रकल्पाच्या पुनरुज्जीवितासाठी यावर्षी केंद्र शासनाने राज्य शासनास सुमारे ३५०० कोटी रुपयांचा वेगळा निधी उपलब्ध करुन दिला असल्याचेही त्याचसुमारास (माहे एप्रिल, २०१५) रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, पुनरुज्जीवित होणाऱ्या या वीज प्रकल्पाद्वारे ग्राहकांना कोणत्या दरात वीज प्राप्त होणार आहे, तसेच सदर वीज प्रकल्प सुरु होण्याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे अंशत: खरे आहे, कर्जदारांचे आरजीपीपीएल कंपनीवर असलेल्या कर्जाच्या थकबाकीचे समभागात रुपांतरीत करण्यास, राज्य शासनाच्या या कंपनीतील सहभागाच्या अनुषंगाने मान्यता दर्शविली आहे.

(२) केंद्र शासनाच्या गॅस पुरविण्याच्या योजनेतंर्गत वीज प्रकल्प सुरु करण्याचा प्रयत्न सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) केंद्र शासनाच्या गॅस पुरविण्याच्या योजनेंतर्गत वीज निर्मिती अपेक्षित असून सदर वीज रेल्वेला रु. ४.७० दराने पुरविण्याचे प्रस्तावीत आहे.

-----------------

**मौजे मोर्वेवाडी (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळण्याबाबत**

**(१४) * ८२०७ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मोर्वेवाडी (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथील आंबा बागायतदाराने आंबा नुकसानीसंदर्भात माहे मे, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात आत्महत्या केल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेबाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर मयत आंबा बागायतदाराच्या कुटुंबियांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच मदत केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) होय.

(३) आत्महत्याग्रस्त व्यक्ती पांडुरंग हरी कोल्हे यांना दारुचे व्यसन असल्याने त्यांनी दारुच्या नशेत आत्महत्या केली आहे. आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या वारसांना मदत देण्याच्या निकषात सदर आत्महत्या बसत नसल्याने जिल्हास्तरीय समितीने सदर आत्महत्येचे प्रकरण अपात्र ठरविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मराठवाडयातील शेतकऱ्यांना सौर कृषि पंप योजनेचा लाभ देणेबाबत**

**(१५) * ७४६४ श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शासनाने सौर कृषि पंप योजना अंमलात आणली मात्र विदर्भाच्या तुलनेत मराठवाडयास सदर योजनेचा लाभ देण्यात अन्याय झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मराठवाडयात होणाऱ्या आत्महत्येचा विचार करुन मराठवाडयातील शेतकऱ्यांना सौर कृषि पंप योजनेचा लाभ पुरेशा प्रमाणात देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारण काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही. शासनाने सौर कृषि पंप आस्थापित करण्याचे एकत्रित धोरण दिनांक २७.३.२०१५ रोजी जाहिर केले आहे. या धोरणांतर्गत प्रामुख्याने राज्यातील आत्महत्याग्रस्त सहा जिल्ह्यांमध्ये, राज्यातील अतिदुर्गम भागामध्ये व पारंपारिक पद्धतीने विद्युतिकरण न झालेल्या गावांमध्ये व कृषिपंपासाठी महावितरणाकडील पैसे भरुन प्रलंबित असलेल्या ग्राहकांसाठी पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येणार आहे. यामध्ये मराठवाड्यासह राज्यातील २० जिल्ह्यांना लाभ मिळणार आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालेगाव तालुक्यातील निळगव्हाण शिवारात काठेवाडी तांड्यातील गाई विषबाधा होऊन मृत्यूमुखी पडल्याबाबत

**(१६) * ८१३२ श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव तालुक्यातील निळगव्हाण शिवारात काठेवाडी तांड्यातील १२ गाई मृत्युमुखी पडल्या तर ४० ते ५० गाईंना विषबाधा झाली असल्याची व त्यामुळे पाच लाखाचे नुकसान झाल्याची घटना माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करून संबंधित पशुपालकांना आर्थिक मदत देण्याबाबत काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे.
(२) सदर जनावरांच्या मृत्यू तीव्र स्वरुपाच्या ॲसिडोसीस मुळे झाला आहे. सदरची बाब ही नैसर्गिक आपत्तीत मोडत नसल्यामुळे मृत जनावरांच्या मालकांना नुकसान भरपाई देय होत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील प्रलंबित अपारंपारिक ऊर्जा प्रकल्प सुरू करण्याबाबत**

**(१७) * ८३८८ श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेल्या पाच वर्षात राज्यातील अपांरपारिक ऊर्जेतील केवळ पवन ऊर्जेत विविध कंपन्यांनी सुमारे २५०० कोटीची गुंतवणूक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अपांरपारिक ऊर्जा प्रकल्प प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवीन ऊर्जा प्रकल्पाची गुंतवणुक, निर्मिती व करार ठप्प आहे, त्यामुळे हजारो कोटी गुंतवणूक केलेल्या खाजगी कंपन्या अडचणी आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रलंबित अपारंपारिक ऊर्जा धोरणाबाबत राज्य शासनाने कोणता निर्णय घेतला व प्रलंबित प्रकल्प लवकरात लवकर सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही.

(३) नाही.

(४) व (५) सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, ऊसाच्या चिपाडावर आधारित सहवीज निर्मिती प्रकल्प, लघुजल विद्युत निर्मिती प्रकल्प, कृषिजन्य अवशेषावर आधारित वीज निर्मिती प्रकल्प व औद्योगिक टाकाऊ पदार्थापासून वीज निर्मिती प्रकल्प असे एकूण १४,४०० मे.वॅ.क्षमतेचे नवीन व नवीकरणीय ऊर्जेपासून वीज निर्मितीचे पारेषण संलग्न प्रकल्प आस्थापित करण्याचे उद्दिष्ट असलेले नवीन धोरण नुकतेच जाहीर करण्यात आले आहे.

-----------------

**ग्रामीण भागात अखंड वीज पुरवठ्यासाठी “फिडर सेपरेशन” योजनेबाबत**

**(१८) * ८५१६ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागात अखंड वीज पुरवठयासाठी “फिडर सेपरेशन” योजना तयार केली असून दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण विद्युतीकरण योजनेंतर्गत केंद्र शासनाकडे राज्य शासनाने चार हजार कोटी रुपयांची मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनांचे स्वरुप काय आहे व त्यासाठी केंद्र शासनाकडे राज्य शासनाने ४ हजार कोटी रुपयांची मागणी केव्हा केलेली आहे,
(३) उक्त मागणीनुसार केंद्र शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, असल्यास, किती निधी केव्हा उपलब्ध झाला आहे,
(४) केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध करण्यात आला नसल्यास त्याचा पाठपुरावा कशाप्रकारे करण्यात येत आहे व उक्त योजना कशाप्रकारे राबविण्यात येणार आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे. दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण विद्युतीकरण योजनेअंतर्गत फिडर सेपरेशन योजनेकरीता रु.१२९०.५७ कोटी ची मागणी केलेली आहे.
(२) दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेची (DDUGJY) उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

अ) ग्रामीण भागातील सामायिक फिडरवरुन वीज पुरवठा होत असलेल्या अकृषीक ग्राहकांना स्वतंत्र फिडरद्वारे २४X७ वीज पुरवठा करणे. ग्रामीण भागातील कृषी व अकृषीक फिडर विलगीकरण करणे.

ब) ग्रामीण भागातील वीज वितरण प्रणालीचे सक्षमीकरण, श्रेणीवर्धन, बळकटीकरण करणे, वीज वितरण प्रणालीतील वीज हानीचे योग्य मोजमापक करण्यासाठी ऊर्जा अंकेक्शन (Energy Audit) महत्वाचे असल्याने, यासाठी ग्राहकांकडील तसेच वीजवितरण रोहित्रे व फिडर यावर योग्य क्षमतेची मीटर लावणे.

क) ग्रामीण भागातील घरगुती व दारिद्रयरेषेखालील लाभार्थी नागरिकांच्या घरांसाठी नवीन वीज जोडण्या देण्यासाठी लागणारी वीज वितरण यंत्रणा उभारणे.

ड) संसद आदर्श ग्राम योजनेच्या गावांमध्ये वीजवितरण प्रणालीचे सक्षमीकरण, आधुनिकीकरण करणे, सदर प्रकल्प अहवाल बनविण्याचे काम पुर्ण झाले असून, केंद्र सरकारकडे मंजूरी करीता नोडल एजन्सी मे.आरईसी द्वारे सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करण्यात येत आहे.

(३) व (४) केंद्र शासनाकडे डीपीआर सादर केल्यानंतर, निधी मंजूर केला जाणार आहे. डीपीआर सादर करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

-----------------

## राज्यातील पशुधन वाढविण्याबाबत

**(१९) * ८६११ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागील वर्षाभरात राज्यात सुमारे दीड लाख गाई-बैलांची कत्तल केली जात असल्याची माहिती राज्याचे पशुसंवर्धन विभागाने दिली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पशुवंसर्धन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यास पुरक रोजगार मानला जातो, एकेकाळी पशुधनाचे प्रमाण सर्वाधिक होते मात्र गेल्या काही वर्षापासून हे प्रमाण २९ टक्क्यांनी घसरल्याने राज्यातील पशुधनाचे प्रमाण चिंताजनक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने राज्यात पशुधन वाढविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे अंशतः खरे आहे. राज्यात महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा १९७६ प्रमाणे गायींच्या कत्तलीस बंदी असल्यामुळे गायींची कत्तल करण्यात आलेली नाही. तथापि, दिनांक ०१/०४/२०१४ ते ०३/०३/२०१५ या कालावधीत एकूण २,६५,४०२ बेल व वाळूची कत्तल करण्यात आली आहे.

(२) खरे नाही. सन २००७ व २०१२ च्या पशुगणणेचा विचार करता एकूण पशुधनात ९.६४ टक्क्यांनी घट झाली आहे. त्यामुळे मागील काही वर्षापासून हे प्रमाण २९ टक्क्यांनी घसरल्याने राज्यातील पशुधनाचे प्रमाण चिंताजनक अवस्थेत नाही.

(३) राज्यात पशुधन वाढविण्यासाठी कृत्रिम रेतन कार्यक्रम, आनुवंषिक सुधारणा योजना, पशुखाद्य वाटप करणे, वैरण विकास योजना तसेच दुधाळ जनावरे, शेळ्या मेंढ्या व कोंबड्यांचे वाटप करणे अशा विविध योजना राबविण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील राज्य उत्पादन शुल्क विभागातील पदे भरणेबाबत

**(२०) * ८७०५ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील राज्य उत्पादन शुल्क विभागातील ३५ अधिकाऱ्यांसह ५५ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे उत्पादन शुल्काची वसूली पुर्णपणे होत नसल्याने शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत असून जिल्ह्यात सध्या कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर कामाचा अतिरिक्त ताण पडत असल्याने सदर रिक्त पदे तातडीने भरण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(३) अद्यापपर्यंत याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) सोलापूर जिल्ह्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाकरीता मंजूर १५३ पदांपैकी १०२ पदे भरलेली असून ५१ पदे रिक्त आहेत.

उपलब्ध कर्मचाऱ्यांच्या वापर करुन उत्पादन शुल्क वसूलीचे उदीष्ट पूर्ण करण्यात आले आहे. तथापि, या कर्मचाऱ्यांवर पडणारा कामाचा ताण विचारात घेऊन रिक्त पदे भरण्याची कार्यवाही तातडीने करण्यात येत आहे.

-----------------

## तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील वाळू तस्करी रोखण्याबाबत करावयाची कार्यवाही

**(२१) * ८९०६ श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्यातील जावरा रेतीघाटाचा लिलाव झालेला नसून या रेती घाटातून मोठ्या प्रमाणात वाळूची तस्करी होत असल्याचे तसेच, अंजनगाव (जि.अमरावती) या तालुक्यात रेतीचे नियमबाह्य उत्खनन होत असल्याचे माहे मार्च-एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रेतीचे अवैध होत असलेले उत्खनन त्वरीत थांबविण्याबाबत तसेच अवैध रेतीचे उत्खनन करणाऱ्यांवर व अवैध रेती उत्खननाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित विभागावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, अमरावती जिल्ह्यात दररोज ४० ते ५० ट्रकद्वारे प्रति ट्रक ५० टन प्रमाणे कन्हान रेतीची वाहतूक सुरु असून रॉयल्टी पास केवळ रु.५०००/- ची आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मध्यप्रदेश मधून जिल्ह्यात अवैध अतिभार रेतीची वाहतुक सुरु असून अशा वाहनांची यादी विभागाच्या अधिका-यांकडे हप्ता वसूलीसाठी उपलब्ध असूनही याबाबत संबंधित विभागाकडून कोणतीही कार्यवाही होत नसल्याने याबाबतचे स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे १ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती यांना निवेदन देऊनही कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अतिभार वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कडक कारवाई करून सदर वाहतुकीस प्रतिबंध घालण्याबाबत शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्यातील जावरा येथील रेती घाटातून रेतीचे अवैध अत्खनन होत असल्याचे निदर्शनास आले नाही. मात्र, तिवसा व अंजनगावसुर्जी या तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन/वाहतुकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत. त्यानुसार एप्रिल, २०१५ ते जून २०१५ या कालावधीत गौण खनिजाच्या अर्वध उत्खनन/वाहतूकीच्या प्रकरणात तिवसा तालुक्यात ३ प्रकरणांत रु. १८,०००/- व अंजनगाव सुर्जी तालुक्यात १४ प्रकरणांत रु.१.७८ लाख एवढा दंड वसूल करण्यात आला आहे.

(३), (४) व (५) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १ जून, २०१५ रोजी प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती यांना दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी वायुवेग पथकातील अधिकाऱ्यांना कारवाई करण्याचे निदेश दिले. त्यानुसार सदर पथकाने जून, २०१५ या महिन्यात राबविलेल्या तपासणी मोहिमेदरम्यान दोषी आढळलेल्या ७ वाहनधारकांकडून एकूण रु. १,७७,०८०/- एवढे तडजोड शुल्क व विभागीय कारवाई शुल्क वसूल करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नांदेड जिल्ह्यात राज्य परिवहन महामंडळाच्या आगारातील अनेक वाहक चालक विनापरवाना गैरहजर असल्याबाबत**

**(२२) * ८९५२ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात राज्य परिवहन महामंडळाचे ९ आगार असून या आगारात ५४५ बसेस धावतात या आगारातील अनेक वाहक चालक मागील काही दिवसापासून विनापरवाना गैरहजर असल्याने काही बसेस उशिरा धावत असल्याने प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) राज्य परिवहन महामंडळाच्या नांदेड विभागात ९ आगारे असून ५४५ बसेसद्वारे प्रवासी वाहतूक केली जाते. नांदेड विभागात १०७६ चालक व १११८ वाहक नियुक्तीस आहेत. माहे मे, २०१५ मध्ये ६२ चालक व ७४ वाहक यांच्या गैरहजेरीमुळे राज्य परिवहन फेऱ्यांची वाहतूक उशिरा सुटलेली आहे. गैरहजर राहिलेल्यांपैकी ५० चालक व ५६ वाहक यांचेवर खातेनिहाय कारवाई करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भाडेतत्वावरील शासकीय जमीन मालकी हक्काने देण्याचा शासनाने घेतलेला निर्णय**

**(२३) * ९२६१ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाडेतत्वावरील शासकीय जमीन मालकी हक्काने देण्याचा निर्णय शासनाने घेतला असतानाच भारत-पाकिस्तान फाळणीच्यावेळी ज्या सिंधी हिंदुंना घरांसाठी जमीन देण्यात आल्या त्यांना तेथील कायमस्वरुपी मालकी देण्याचा निर्णय शासनाने नुकताच घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) या सिंधी हिंदुंना जमीन दिल्यानंतर मिळालेल्या जमिनीपेक्षा जास्त जमिनीवर बांधकाम केले असे जास्तीचे बांधकाम देखील वेगळा कायदा करुन रेडिरेकनरच्या दरात कपात करुन देणारा कायदा आणला जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) फाळणीच्या पाकिस्तानातुन आलेल्या निर्वासितांच्या पुनर्वसनासाठी केंद्र शासनाने कायदे केले होते. त्यापैकी निर्वासित इसम (नु. व पु.) अधिनियम, १९५४ अन्वये निर्वासितांचे पुनर्वसन व त्यांना जमिनीचे वाटप करण्यात येत असे या अधिनियमांतर्गत निर्वासितांना कोणत्याही अटी व शर्तीविना जमिनी/जागांचे वाटप करण्यात येत असे. निर्वासितांना घरासाठी दिलेल्या जमिनी कायम मालकी हक्काने द्याव्यात, याबाबतची कोणतीही मागणी किंवा प्रस्ताव विभागाच्या विचाराधीन नाही.

सप्टेंबर, २००५ मध्ये केंद्र शासनाने निर्वासित इसम (नु. व .पु) अधिनियम, १९५४ अधिनियम निरसित केला आहे.
(२) याबाबत कोणताही प्रस्ताव विभागाच्या विचाराधीन नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील खंडकरी शेतकऱ्यांना त्यांच्या मालकीच्या जमिनी परत मिळण्याबाबत**

**(२४) * ९३७३ श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चार दशकांहून अधिक वर्षे न्यायालयीन लढा जिंकल्यानंतर राज्यातील खंडकरी शेतकऱ्यांना त्यांच्या मालकीच्या जमीनी परत करण्याचा निर्णय झाल्यानंतरही महसूल व भूमी अभिलेख विभागातील अधिकाऱ्यांकडून जमीन वाटपास टाळाटाळ केली जात असल्यामुळे अजूनही नाशिक व अहमदनगर जिल्ह्यातील शेकडो खंडकरी शेतकऱ्यांना जमीनींचे वाटप झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उंदिरवाडी (ता.येवला, जि.नाशिक) येथील तीन खंडकरी शेतकऱ्यांची महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या ताब्यातील मौजे संवत्सर, ता.कोपरगांव येथील गट नं. ४१३ मधील जमीन त्यांना परत न मिळाल्यामुळे ते शासकीय कार्यालयात फेऱ्या मारीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

मौजे उंदिरवाडी, ता.येवला, जि.नाशिक येथील माजी खंडकरी श्रीमती ठकुबाई पुंजाबा सोनवणे, भिमराज दगडु सोनवणे व किसन बजाबा सोनवणे यांची मौजे संवत्सर येथील गट नं ४१३ ही जमीन मिळावी अशी मागणी होती. मात्र सदर सर्व्हे नंबर वाटपासाठी उपलब्ध नसल्याने सदर खंडकरी शेतक-यांना इतर सर्व्हे नंबर मधील जमीन वाटप करण्यात आलेली आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील शासकीय कार्यालयांनी विजेची देयके थकविली असल्याबाबत

**(२५) * ९५५८ ॲड.अनिल परब, डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई पोलीस आयुक्तालय, विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता, मुंबई जिल्हाधिकारी, शहर दिवाणी न्यायालय, पोलीस आयुक्त, जीटी रुग्णालय व कामा रुग्णालय इत्यादी कार्यालयांनी विजेची सुमारे १३ कोटी पेक्षा जास्त रक्कमेची देयके थकविली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर देयके थकविण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर देयकांची रक्कम केव्हा अदा करण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे, मुंबई पोलीस आयुक्तालय, विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता, मुंबई जिल्हाधिकारी, शहर दिवाणी न्यायालय, पोलीस आयुक्त, जीटी रुग्णालय तसेच कामा हॉस्पीटलकडे थकबाकी अंदाजे रु. ५६ कोटी इतकी आहे.
(२) व (३) उक्त थकबाकीदार वीज ग्राहकांना विद्युत देयक भरण्यासाठी शासकीय अनुदान वेळेत मंजूर न झाल्यामुळे वीज देयक वेळेत अदा करण्यात आलेली नाहीत. तसेच वीज देयकाच्या थकबाकी वसुलीसाठी या आस्थापनाच्या वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांबरोबर पाठपुरावा करण्यात येत असून शासकीय अनुदान मिळतांच वीज देयक त्वरीत अदा करण्यात येणार आहेत.

-----------------

**महावितरण, महापारेषन आणि महानिर्मिती कंपन्यांमध्ये कार्यरत असलेल्या वीज कामगारांना कामगारांच्या वैद्यकिय भत्त्याची रक्कम भरणेबाबत**

**(२६) * ९६१९ श्री.आनंद ठाकूर, श्री.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण, महापारेषन आणि महानिर्मिती या तीनही वीज कंपन्यांमध्ये कार्यरत असलेल्या तब्बल ८७ हजार वीज कामगरांच्या वैद्यकीय विमाचे दुसऱ्या हफ्त्याचे पैसे न भरल्याने विमा कंपनीने कामगारांना पॉलिसी लाभ देणे बंद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वेतन करारानंतर २१ महिन्यांच्या दिरंगाईने विमा पॉलिसी सुरु करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नूसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने थकित विम्याचे हप्ते विमा कंपनीला तातडीने देण्याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, उपाययोजनेस होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

तथापि, कर्मचाऱ्यांना नियमित देय असलेली वैद्यकीय प्रतिपूर्तीची रक्कम व वैद्यकीय भत्याची कपात या रक्कमेतून रु. २० कोटी + सेवाकर इतक्या रक्कमेचा धनादेश दि ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, पुणे यांना दि. १०.०७.२०१५ रोजी अदा करण्यात आला असून, योजनेचा लाभ डिसेंबर २०१५ पर्यतच्या कालावधीसाठी सुरु राहणार आहे.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गोवंश हत्याबंदीमुळे या व्यवसायावर अवलंबून असलेल्या कामगारावर ओढावलेली उपासमारीची वेळ**

**(२७) * ९६२३ श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सरकारने केलेल्या गोवंश हत्याबंदीमुळे या व्यवसायावर अवलंबून असलेले कामगार व त्यांचे कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या कामगारांना इतरत्र नोकरी किंवा व्यवसायात सामावून घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, कार्यवाहीस होणाऱ्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सासवणे (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील राष्ट्रीय सहकार विकास निगम (एनसीडीसी) कर्ज प्रकरणामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(२८) * ९६६५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री कापरीदेव मच्छिमार सहकारी संस्था मर्या., सासवणे (ता.अलिबाग, जि.रायगड) या संस्थेला राष्ट्रीय सहकार विकास निगम (एनसीडीसी) मार्फत लाकडी बोटी बांधण्यासाठी कर्ज मंजूर झाले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संस्थेने लाकडी बोटी ऐवजी फायबर बोटी बांधून प्रत्येक बोटीमागे रु.३ लाख ८१ हजार प्रमाणे सुमारे रु.३० लाखाचा अपहार केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी मा.मत्स्यव्यवसाय मंत्री महोदयांनी संबंधीत तत्कालीन चेअरमन व संचालक यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांना आदेश दिले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर आदेशानुसार संबंधीत संस्थेच्या तत्कालीन चेअरमन व संचालक यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,

(५) असल्यास, केव्हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे व दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यानुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(६) अद्याप, या प्रकरणी कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही हे खरे नाही. सासवणे मांडवा विभाग मच्छिमार सहकारी संस्था मर्या., सासवणे, ता.अलिबाग, जि.रायगड या संस्थेस सन २००८-२००९ मध्ये अर्थसहाय्य मंजूर झाले होते. सदर अर्थसहाय्य फेब्रुवारी, २०११ मध्ये श्री.कापरीदेव मच्छिमार सहकारी संस्था मर्या., सासवणे ता.अलिबाग, जि.रायगड या संस्थेकडे वर्ग करण्यात आले.

(२) हे खरे आहे. प्रत्यक्षात रुपये ६०.३९ लाख इतक्या रक्कमेचे अतिरिक्त प्रदान झालेले आहे.

(३) होय.

(४) होय.

(५) दिनांक ८.४.२०१५ रोजी संस्थेच्या संचालकांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयाचा तपास सुरू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर जिल्हयातील शेती कृषी पंप धारकांना वीज जोडणी मिळण्याबाबत**

**(२९) * ९७७० श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपुर जिल्हयातील कृषी पंप धारक ४०२७ शेतकऱ्यांच्या कृषी पंपाना वीज जोडणी प्रंलबित असल्याचे दिनांक १ जून, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कृषी पंपधारक शेतकऱ्यांना वीज जोडणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर वीज जोडणी केव्हापर्यत देण्यात येईल,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, दिनांक १ जून, २०१५ रोजी चंद्रपूर जिल्हयातील ४५७२ कृषी पंप धारकांच्या वीज जोडण्या प्रलंबित होत्या.

(२) होय, चंद्रपूर जिल्हयात शासनातर्फे अनुशेष योजनेअंतर्गत वर्ष २०१५-२०१६ या वर्षासाठी ७० कोटी रुपये शासनाने मंजूर केले असून त्यामुळे कामे जलदगतीने होणे साठी निविदा काढण्याची परवानगी, क्षेत्रिय कार्यालयांना देण्यात आली आहे. त्याप्रमाणे कार्यादेश देऊन कामे प्रगती पथावर आहेत.

(३) सर्व कृषीपंपाच्या वीज जोडणीचे काम मार्च-२०१६ पर्यंत पुर्ण करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सटाणा (ता.बागलाण, जि.नाशिक) बसस्थानकातील गैरसोयीबाबत

**(३०) * ९९२५ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वात जास्त फलाट असलेल्या सटाणा (ता.बागलाण, जि.नाशिक) येथील राज्य परिवहन मंडळाच्या बस स्थानकात अनेक गैरसोयी असून बसस्थानकास खासगी वाहन तळाचे स्वरुप आलेले असल्याने या समस्येचे तातडीने निवारण करण्याची मागणी स्थानिक नागरीकांकडून करण्यात येत असल्याचे दिनांक १७ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बसस्थानकाचे सिलींगचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याने स्थानकात प्रवाशांना पिण्यासाठी पाणी व स्वच्छतेचाही अभाव असल्याच्या तक्रारी आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सटाणा (ता.बागलाण, जि.नाशिक) बसस्थानकातील गैरसोयीचे निवारण करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) सटाणा येथील रा.प.बसस्थानकाचे नुतनीकरण सन २०१३ मध्ये करण्यात आले असून १५ फलाटांचे बसस्थानक आहे. बसस्थानकाचे छत दर्जेदार असून निवास फलाटाच्या छताला (लोडींग प्लॅटफॉर्मच्या सिलिंग) बसविलेल्या वेजलेल्या फरश्या (परफोटेड टाईल्स) वजनाने हलक्या असल्याने त्या वादळी वा-याने हलल्या असून त्या व्यवस्थीत करुन घेण्यात येत आहेत. तसेच बसस्थानकात प्रवाशांसाठी ध्वनीक्षेपक यंत्रणा, पार्सल कार्यालय, विद्यार्थी पासेसचे वितरण केंद्र, हिरकणी कक्ष, पिण्याचे पाणी, स्वतंत्र प्रसाधनगृहाची सोय, उपहारगृह, वाणिज्य आस्थापना, तीन शिफ्ट मध्ये वाहतूक नियंत्रकांची नेमणूक इत्यादी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.

-----------------

## राज्यात भूसंपादन कायद्याला संमती मिळण्याबाबत

**(३१) * ९९७८ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात भूसंपादन कायद्याला संमती मिळत नसल्यामुळे अपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांबरोबर थेट वाटाघाटी करण्याकरीता जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही समिती जमिनीची किंमत निश्चित करेल व ५० टक्के रक्कम संबंधित शेतकऱ्याला देवून सरकार तातडीने जमिनीचा ताबा घेईल अशा स्थितीत शेतकऱ्याला न्यायालयात जाता येणार नाही, याबाबतचा एक शासन निर्णय दिनांक ९ मे, २०१५ रोजी काढण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निर्णयाला सर्वसामान्यांचा विरोध असतांनाही सदरील निर्णय घेण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) केंद्र शासनाने भूसंपादन कायदा, २०१३ तयार केला असून सदर कायदा राज्यात दिनांक १.१.२०१४ पासून लागू करण्यात आलेला आहे. अपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्यासाठी जमिनी खाजगी वाटाघाटीने घेण्यास नवीन भूसंपादन कायद्यानुसार कोणतेही बंधन नाही, त्यामुळे खाजगी क्षेत्रातील जमीन सिंचन व इतर प्रकल्पांसाठी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने घेणेबाबत शासन निर्णय दिनांक १२.५.२०१५ रोजी निर्गमित करण्यात आलेला असून सदर शासन निर्णयात थेट खरेदी करावयाच्या जमिनीच्या मोबदल्याचा दर ठरविण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याचे नमूद केलेले आहे.
(२) अंशतः खरे आहे.

सदर शासन निर्णय दिनांक ९ मे, २०१५ रोजीचा नसून तो शासन निर्णय दिनांक १२ मे, २०१५ रोजीचा आहे.
(३) व (४) शेतकऱ्यांना मिळणाऱ्या मोबदल्यातील तफावत दूर करण्याच्या अनुषंगाने तसेच प्रकल्पासाठी वेळेत जमीन उपलब्ध व्हावी व प्रकल्पाचे काम विनाविलंब पूर्ण व्हावे याबाबतचा विचार करून सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

-----------------

### जळगांव शहरातील अनधिकृत रिक्षा थांब्यांवर कारवाई करण्याबाबत

**(३२) * १००८९ श्री.गुरुमुख जगवानी :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव शहरातील ९५ वाहतुक रिक्षा थांबे अधिकृत करण्याची यादी जिल्हाधिकारी, जळगांव यांनी मंजूर केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरित अनधिकृत रिक्षा थांब्यावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, अनधिकृत रिक्षा थांब्यावर केव्हा कारवाई करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, गेल्या काही दिवसामध्ये रिक्षाचालकांच्या बेशिस्तपणामुळे व अनधिकृत रिक्षा थांब्यांमुळे शहरातील मुख्य ठिकाणी वाहतुकीवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करणार आहेत,

(६) अद्याप, याबाबत कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे आहे.

(२) जळगांव शहरात अनधिकृत रिक्षा थांब्यांचे अस्तित्व निदर्शनास आलेले नाही.

(३), (४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**देवगड तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) आनंदवाडी मत्स्योद्योग बंदर प्रकल्पाबाबत**

**(३३) * १०३६७ श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगड तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) आनंदवाडी मत्स्योद्योग बंदर प्रकल्प गेली २५ वर्षे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाचे प्रारंभी अंदाजपत्रक ३२ कोटी रुपयांचे असताना ९२ कोटी रुपयांवर गेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा प्रकल्प अनेक वर्षे प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या प्रकल्पाचे काम जलदगतीने होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.

(२) होय.

(३) स्थानिक गावक-यांच्या विरोधामुळे काम बंद पडले असून गावक-यांच्या सहमतीने सुधारीत आराखडा तयार करण्यात आला आहे.

(४) सुधारीत आराखड्यानुसार प्रकल्पाच्या अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकीय मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**राज्यात कृत्रिम पाऊस पाडण्याचा घेतलेला निर्णय**

**(३४) * १०७७५ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात हवामान खात्याने दिलेल्या माहितीवरुन मान्सूनचे आगमन उशिरा होणार असल्याने शासनाने कृत्रिम पाऊस पाडण्याचा निर्णय माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार आतापर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) भारतीय हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार संपूर्ण देशात व विशेषत: महाराष्ट्रामध्ये वार्षिक सरासरीपेक्षा कमी पर्यन्यमान (८८ टक्के) होण्याची शक्यता आहे. यंदा जून महिन्यामध्ये पडलेल्या पावसानंतर पाऊस पडलेला नाही. विशेषत: मध्य महाराष्ट्र व मराठवाडयातील काही जिल्ह्यामध्ये परिस्थिती गंभीर आहे. ज्या भागात जून महिन्यामध्ये पाऊस पडला त्या भागात शेतकऱ्यांनी पेरण्या केलेल्या आहेत. मात्र, पावसाने दिलेल्या ओढीमुळे आता सदर पेरण्या वाया जाण्याची शक्यता निर्माण झालेली आहे.

कमी पावसाची शक्यता विचारात घेऊन, आपत्ती व्यवस्थापन प्रभागाने मे महिन्यात क्लाऊड सिडींग तंत्रज्ञानाद्वारे पाऊस पाडण्याच्या प्रयोगास मान्यता घेऊन निविदा प्रसिध्द केल्या होत्या. सदर निविदेत मे.ख्याती क्लायमेट मॉडिफिकेशन कन्सल्टन्स् यांची निविदा सर्वात कमी दराची असल्याने त्यांना विमानाद्वारे क्लाऊड सिडींग करण्याकरीता लेटर ऑफ इन्टेन्ट देण्यात आलेले आहे.

-----------------

**राज्यातील वीज कंत्राटी कामगारांना कामावरून कमी केल्याबाबत**

**(३५) * ९०२५ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एकाही कंत्राटी कामगाराला कामावरुन कमी करण्यात येऊ नये असे आदेश राज्याचे ऊर्जामंत्री यांनी दिले असतानाही महावितरण प्रशासनाने सदर आदेशाचे पालन न करता कंत्राटी कामगारांना कमी करण्याचा निर्णय घेतला असल्याचे दिनांक १८ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगारांवर बेकारीची वेळ येऊ नये याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही वा उपाययोजना केली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वेल्हा (जि.पुणे) येथील नागरी सुविधा केंद्र बंद केल्याबाबत

**(३६) * १०६२१ श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेल्हा, जि.पुणे येथील नागरी सुविधा केंद्र कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक बंद केले असल्याचे माहे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नागरी सुविधा केंद्रातून दिल्या जाणाऱ्या सेवासाठी शुल्क शासन नियमापेक्षा जादा घेत असल्याचे कारण पुढे करुन सदरहू केंद्र संबंधित तहसिलदारांनी त्यांच्या अधिकारात बंद करुन कार्यालयातील कर्मचाऱ्यांना अर्वाच्च भाषा वापरुन कार्यालयातून हाकलून दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरी सुविधा केंद्र बंद केल्यामुळे नागरीकांची अनेक कामे रखडली असून सदर केंद्रे पुन्हा सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, याबाबत कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) व (३) सदर नागरी सुविधा केंद्र चालविणारी व्यक्ति शासनाने विहित केलेल्या रकमेपेक्षा जादा शुल्क घेत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यामुळे सदरचे नागरी सुविधा केंद्र दि. २७/०४/२०१५ रोजी सायं. ७.०० वाजता तपासणी करण्याकरीता बंद करण्यात आले होते. तथापि, तेथील कर्मचाऱ्यांना अर्वाच्य भाषा वापरुन कार्यालयातून हाकलून दिले, हे खरे नाही. नागरीकांची गैरसोय होऊ नये म्हणून सदर केंद्र तपासणी करुन दुसऱ्या दिवशी सकाळी ११.३० वाजता सुरु करुन सेतू चालक यांचे ताब्यात देण्यात आले.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वक्फ मालमत्तेवरील अतिक्रमणे दूर न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत**

**(३७) * ७२६२ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामराव वडकुते, श्री.संदिप बाजोरिया, श्री.आनंद ठाकूर, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव : ता.प्र.क्र.२७७९ ला दिनांक १० मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वक्फ बोर्डाच्या अतिक्रमण केलेल्या तसेच, वक्फ बोर्डाच्या मालकीच्या लाखो रूपयांच्या अत्यंत कमी किंमतीमध्ये खाजगी व्यक्ती व संस्थांना दिलेल्या जमिनी परत घेण्यासंदर्भात दिनांक ३० जुलै, २०१० रोजी शासनाने अध्यादेश काढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देवस्थाने व वक्फ मालमत्तेवरील बेकायदेशीर हस्तांतरणे, अतिक्रमणेबाबत आढावा घेऊन महसूल विभागाच्या दिनांक ३० जुलै २०१० रोजीच्या शासन परिपत्रकाप्रमाणे सक्षम कारवाई न करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत परभणी-हिंगोलीचे स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव महसूल यांच्याकडे माहे सप्टेंबर २०१४ मध्ये वा त्यादरम्यान लेखी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील शासन परिपत्रकाप्रमाणे विहित मुदतीत आढावा न घेणाऱ्या तसेच ७/१२ वर त्या मालमत्तेची नोंद न घेणाऱ्या परभणी जिल्ह्यातील संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे, तसेच देवस्थाने व वक्फ मालमत्ता यांची सातबारावर नोंद घेण्याबाबतची प्रक्रिया किती मुदतीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(५) असल्यास, सदर हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथसह इतर ठिकाणच्या जमिनीवरील अतिक्रमण हटवून जमिनी शासनाने ताब्यात घेण्यात आल्या आहेत काय,

(६) असल्यास, अद्याप किती जमिनीवर अतिक्रमणे आहेत, सदर जमिनीवरील सर्व अतिक्रमणे काढणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) याबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) राज्यातील देवस्थानांच्या जमिनीची तपासणी तसेच अशा जमिनी बेकायदेशीररित्या हस्तांतरीत झाल्या असल्यास पूर्ववत देवस्थानांच्या नावे करण्याबाबत महसूल व वन विभागाने शासन परिपत्रक डीईव्ही-२०१०/प्र.क्र.९/ल-४, दिनांक ३०.०७.२०१० निर्गमित केले आहे.

(२) होय.

(३) व (४) परभणी व हिंगोली जिल्ह्यांमध्ये दिनांक ३०.०७.२०१० रोजीच्या वर उल्लेखीत शासन परिपत्रकानुसार देवस्थान ईनामाच्या जमिनी विषयक आढावा घेण्यात आला आहे. परभणी जिल्ह्यातील बेकायदेशीर हस्तांतरण झालेल्या २११ देवस्थान इनाम जमिनीच्या गाव नमुना क्र.७/१२ मधिल नोंदी पुनर्स्थापीत करण्यात आल्या आहेत. उर्वरीत जमिनी विषयी अर्धन्यायिक स्वरुपाची कार्यवाही सुरू आहे.

(५), (६) व (७) हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ तालुक्यात कोणत्याही देवस्थान ईनाम जमिनीवर अतिक्रमण अथवा बेकायदेशीर हस्तांतरण आढळून आलेले नाही. हिंगोली जिल्ह्यातील इतर गावातील देवस्थान ईनामी जमिनीवर अतिक्रमण किंवा अवैध हस्तांतरण झाले आहे किंवा कसे याबाबत शहानिशा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## मौजे माळापूरी (ता.जि.बीड) येथील अतिक्रमण धारकांचे अतिक्रमण नियमाकुल करण्याबाबत

**(३८) * १०२३० श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे माळापुरी (ता.जि.बीड) येथील शासकीय गायरान जमीन गट नं.१२६ मधील १६ हेक्टर ४१ आरमध्ये सुमारे २२ भुमिहिन मागासवर्गीय शेतकऱ्यांनी सन १९८१ पासून वहिती केली असून या जमिनीचे अतिक्रमण नियमाकुल करण्याची मागणी संबंधितांनी दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भुमिहीन मागासवर्गीय शेतकऱ्यांचे अतिक्रमण नियमाकुल करण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करत आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, शासन निर्णयातील तरतुदीनुसार मौजे माळापूरी येथील अतिक्रमण धारकांचे अतिक्रमण नियमाकुल करण्यासाठी झालेल्या विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अशा स्वरुपाचे निवेदन जिल्हाधिकारी, बीड यांना प्राप्त झाले आहे.

(२) व (३) सदर मागणीच्या अनुषंगाने तहसिलदार, बीड यांचेमार्फत चौकशी करण्यात आली. सदर चौकशीनुसार निवेदनात नमूद जमिनीवर सन १९९० पुर्वीचे अतिक्रमण असल्याचे पुरावे व महसूली अभिलेखात कुठेही त्यासंबंधी नोंद आढळून आलेली नाही. त्यामुळे सदर अतिक्रमणे नियमानुकूल करता येत नाहीत.

-----------------

**यवतमाळ व उस्मानाबाद जिल्हयातील आत्महत्याग्रस्तांना विशेष मदत व सहाय्य करण्यासाठी सचिव दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याबाबत**

**(३९) * ९९४२ श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ व उस्मानाबाद जिल्हयातील आत्महत्याग्रस्त क्षेत्रास विशेष मदत व सहाय्य करण्याकरीता सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१४-२०१५, २०१५-२०१६ या वर्षात बीड जिल्हयातील सर्वाधिक शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या असतानासुध्दा बीड जिल्हा यामधून वगळण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यवतमाळ व उस्मानाबाद जिल्हयाच्या धर्तीवर बीड जिल्हयातील आत्महत्याग्रस्त क्षेत्रासही विशेष मदत व सहाय्य करण्यासाठी सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यावर काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) यवतमाळ व उस्मानाबाद या जिल्हयांची निवड पथदर्शी प्रकल्प म्हणुन करण्यात आली आहे.

(३) व (४) होय, अशी मागणी करण्यात आली आहे. राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी व तद्नुषंगाने ठोस उपाययोजना करण्यासाठी यवतमाळ व उस्मानाबाद या ०२ जिल्हयांची निवड पथदर्शी प्रकल्प म्हणुन करण्यात आली आहे. राज्यातील उर्वरित आत्महत्याग्रस्त/आत्महत्याप्रवण जिल्हयांबाबत यथावकाश निर्णय घेण्यात येणार असल्याने मागणीच्या अनुषंगाने सद्यस्थितीत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ नागपूर मार्गावरील मौजा डोर्ली व भारी येथील शेतकऱ्यांनी पांदण रस्त्याच्या मुक्ततेसाठी केलेल्या मागणीबाबत

**(४०) * ७९०२ श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ नागपूर मार्गावरील मौजा डोर्ली व भारी येथील अनेक शेतकऱ्यांनी दिनांक ३० मार्च, २०१५ रोजीच्या सुमारास तहसिलदार व जिल्हाधिकाऱ्यांना पांदण रस्त्याच्या मुक्ततेसाठी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पांदण रस्ताच अडविल्यामुळे शेती पडिक होत असल्याने शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्याचा इशारा जिल्हा महसूल प्रशासनाला दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) प्रश्नाधीन प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्र.६७३५/२०१३ मध्ये दिनांक १९/१२/२०१३ च्या आदेशान्वये पांदण रस्ता खुला करण्याबाबत तहसिलदार, यवतमाळ यांनी चौकशी करुन व संबंधितांना म्हणणे मांडण्याची संधी देवून निर्णय घेण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार चौकशीअंती सदर वादग्रस्त जमिनीवर हद्द कायम नसल्याने भूमी अभिलेख विभागामार्फत मोजणी करुन घेवून हद्द व खुणा कायम करुन शिवधुरा निश्चित करुन घ्यावी व तदनंतर शिवधु-याच्या वहिवाटीवर निर्माण करण्यात आलेला अडथळा दूर करुन वहिवाट पुर्ववत करावी असे दिनांक १७/११/२०१४ रोजी तहसिलदार, यवतमाळ यांनी मामलतदार न्यायालय अधिनियमांतर्गत आदेशित केले आहे. तदनंतर जमीन मोजणीबाबत विवाद निर्माण झाल्याने पुनः जमिनीची संयुक्त मोजणी करण्याबाबत निर्देशित करण्यात आले आहे. प्रश्नांकित पांदण रस्त्याच्या परिसरातील बहुतांश जमिनीवर पेरणी झालेली असून या प्रकरणी शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्याचा इशारा महसूल प्रशासनास दिलेला नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयात पाणीपुरवठा योजना वीज जोडणीअभावी सुरु न झाल्याबाबत

**(४१) * ७८७६ श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात पाणीपुरवठयाच्या २६ पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्या असून वीज जोडणी अभावी योजना सुरु न झाल्याने नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्ण झालेल्या पाणी पुरवठा योजनांना वीज जोडण्या न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने यवतमाळ जिल्हयातील पाणीटंचाई विचारात घेऊन तातडीने पूर्ण झालेल्या योजनांना विद्युत जोडण्या देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे. यवतमाळ जिल्हयातील २६ पाणीपुरवठा योजनांपैकी वीज जोडणीबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे :-

वीज पुरवठा करण्यात आलेला आहे (११), डिमांड नोटचा भरणा केलेला नाही (५), कामे प्रगतीपथावर आहेत (५), DDE १.३% मध्ये अंदाजपत्रक मंजुर असून ग्रामपंचायत कडून काम प्रलंबित आहे (२), DDF १.३% मध्ये अंदाजपत्रकीय खर्च करण्यास असमर्थ असल्यामुळे सदर कामे डीपीडीसी २०१५-१६ मध्ये प्रस्तावित केलेले आहे (१), ग्रामपंचायत कडून संच मांडणी तयार नाही (१), विद्युत निरीक्षकाचे परवानगी अप्राप्त आहे (१).

(२) महावितरणकडून वीज जोडणीची कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महावितरण कंपनीने रत्नागिरी येथील रत्नागिरी गॅस ॲण्ड पॉवर प्रोजेक्ट कंपनीस रुपये २३०० कोटी अदा करण्याबाबत लवादाने दिलेला निर्णय**

**(४२) * ७५५२ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे दाभोळ (जि.रत्नागिरी) येथील रत्नागिरी गॅस ॲण्ड पॉवर प्रोजेक्ट कंपनी आणि महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांच्यात माहे एप्रिल, २००७ मध्ये वा त्यादरम्यान वीज खरेदी करार करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर करारानुसार ९५ टक्के वीज महावितरण कंपनी विकत घेईल अशीही अट सदर करारामध्ये नमूद करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरण कंपनीने सदर करारातील अटीचा भंग केल्याप्रकरणी वीज अपिलीय लवादाने दिलेल्या निवाडयानुसार सन २०१२-१३ आणि २०१३-१४ या वर्षासाठी वीजनिर्मिती संचाच्या स्थिर आकारापोटी सुमारे २३०० कोटी रुपये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने दाभोळ (आरजीपीपीएल) वीज प्रकल्प कंपनीस अदा करावे, असे आदेश दिले असल्याचे दि. २४ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, करारातील अटीचा भंग करण्याचे कारण काय, तसेच इतक्या मोठ्या प्रमाणातील रक्कम कोणत्या पध्दतीने अदा करण्यात येणार आहे,

(५) तसेच या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) करारातील कोणत्याही अटीचा भंग केलेला नसून मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक १३/०५/२०१५ च्या आदेशानुसार आवश्यकता असल्यास अपिलिय प्राधिकरणाच्या दिनांक २४/०४/२०१५ च्या वीज निर्मिती न करता स्थिर आकार देण्याच्या आदेशाविरुध्द सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### तारापूर अणुऊर्जा प्रकल्पातून जादा वीज निर्मिती करण्याबाबत

**(४३) * ८५१७ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूरला सन १९६९ मध्ये अणुऊर्जा प्रकल्प सुरु झालेला असून या प्रकल्पातून आणखी वीज निर्मिती करता यावी यासाठी सुमारे ५०० मेगावॅट क्षमतेचे दोनसंच उभारण्यासाठी सर्वेक्षण सुरु करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील वीजेची गरज विचारात घेता सदर प्रकल्पाचा विस्तार करण्यासाठी सुरु असलेल्या सर्वेक्षणाची माहिती घेण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भातील सद्य:स्थिती काय आहे व प्रत्यक्षात वीज निर्मिती केव्हापासून सुरु होणे अपेक्षित आहे,

(४) यासंदर्भात राज्य शासनाकडून कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### भिवंडी तालुक्यात नदी, नाले, खाडीपात्रात बेकायदेशीर वाळू उपसा होत असल्याबाबत

**(४४) * ८६१४ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी तालुक्यात नदी, नाले, खाडीपात्रात बेकायदेशीर सेक्शन पंपाने वाळू उपसा होत असून राजरोसपणे वाळूविक्री होत असल्याचे माहे मे-२०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी तालुक्यात होत असलेल्या बेकायदेशीर वाळू उपसा व विक्रीवर निर्बंध घालण्यासाठी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) भिवंडी तालुक्यातील सक्शन पंपाने वाळूचा बेकायदेशीररित्या उपसा होत असल्याची बाब दृष्टीत्पतीस आली आहे.

(२) भिवंडी तालुक्यात गौण खजिजाचे अवैधरित्या उत्खनन/वाहतूकीस आळा घालण्याकरिता मंडळ निहाय पथके गठित करण्यात आली आहेत. या पथकांनी केलेल्या कार्यवाहीत सन २०१४-१५ या कालावधीत अवैध उत्खनन/वाहतूकीच्या २९८ प्रकरणांत रु.५५.८१ लक्ष एवढया दंडात्मक रक्कमेची वसूली करण्यात आली असून, ५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच एप्रिल २०१५ ते जून २०१५ या कालावधीत १० प्रकरणांत रु. २.४८ लक्ष एवढया दंडात्मक रक्कमेची वसूली करण्यात आली असून, ३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दक्षिण सोलापूर तालुक्यातील भिमा नदी काठावर कृषी पंपासाठी दिवसभर वीज उपलब्ध करून देण्याबाबत

**(४५) * ८७०६ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण सोलापूर तालुक्यातील भिमा नदी काठावरील कृषी पंपासाठी वीज दररोज प्रदिर्घ काळ बंद ठेवण्यात येत असल्यामुळे तेथील शेतकऱ्यांना भिमा नदीतील पाण्याचा शेतीसाठी फारसा उपयोग करुन घेता येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मात्र भिमा नदीच्या पलिकडील काठावरील कर्नाटक राज्यातील शेतकऱ्यांना २४ तास वीज उपलब्ध असल्यामुळे भिमा नदीच्या पाण्याचा पुर्णपणे लाभ घेता, येतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दक्षिण सोलापूर तालुक्यातील भिमा नदीच्या काठावर कृषी पंपाची वीज दिवसभर उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) अद्याप, कार्यवाही करण्यात आली, नसल्याची त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे, अंशतः खरे आहे. जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्याच्या हद्दीतील भीमा नदी काठावरील औज व चिंचपूर बंधाऱ्यावरील कृषीपंपाचा वीज पुरवठा जनतेच्या पिण्याच्या पाण्याची निकड लक्षात घेता दिनांक १८/०३/२०१५ पासून तात्पुरता बंद करण्यात आला आहे. त्यामुळे सद्यस्थितीत चारही कृषी विद्युत वाहिन्यांवरील वीज पुरवठा पूर्णपणे बंद आहे.

(२) भिमा नदीच्या पलीकडील काठावरील कर्नाटक हद्दीतील कृषीपंपाचा वीज पुरवठा हा महावितरणशी संबंधीत नसल्यामुळे तेथील पाणी वाटपाबाबत या विभागाकडे माहिती उपलब्ध नाही.

(३) दक्षिण सोलापूर तालुक्यातील भिमा नदीच्या काठावरील कृषी पंपांना देण्याकरीता महावितरणकडे वीज उपलब्ध आहे परंतु त्याभागातील पिण्याच्या पाण्याची निकड लक्षात घेता शेतीसाठी होणारा पाण्याचा अपव्यय थांबविण्याकरीता जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या आदेशान्वये तेथील वीज पुरवठा दिनांक १८/०३/२०१५ पासून तात्पुरता बंद केलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यातील १४ तालुक्यांत चारा टंचाई निर्माण झाल्याबाबत

**(४६) * ८९१२ श्री.हरिसिंग राठोड, श्री.राजेंद्र मुळक, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील १४ तालुक्यांत चारा टंचाईचे संकट तीव्र झाले असल्याचे दिनांक ५ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चाऱ्याचे वाढते दर आणि चाऱ्याची निर्माण झालेली टंचाई यामुळे जिल्ह्यात ३ लाख २८ हजार ६०८ मेट्रीक चाऱ्याची कमतरता निर्माण झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चाऱ्यांची कमतरता दूर करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) मे महिना अखेर नांदेड जिल्ह्यात १.६५ लाख मे.टन चारा जो सुमारे ३५ दिवस पुरेल इतका उपलब्ध होता. त्यामुळे जिल्ह्यात ३ लाख २८ हजार ६०८ मेट्रीक चा-याची कमतरता निर्माण झाली हे खरे नाही.
(३) व (४) जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांच्यातर्फे रुपये ३०.०० लाख खर्च करुन मका पिकाचे ४३.४७५ मेटन, ज्वारी मालदांडी १०.०० मेटन इ. चारा पिकाचे बियाणे व बहुवार्षिक गवत पिकांची ४.०० लाख ठोंबे वैरण उत्पादक शेतक-यांना १०० टक्के अनुदानावर वाटप करण्यात आले. त्यामुळे १२८५ हेक्टर क्षेत्रावर हा कार्यक्रम राबवून वैरण उत्पादन करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले आहे.

पशुसंवर्धन विभागाने जिल्ह्यातील शेतक-यांना हायड्रोपोनिक तंत्रज्ञानाद्वारे चारा उत्पादनाची १६ प्रात्यक्षिके आत्माकडून मंजूर करून दिली आहेत.

पशुसंवर्धन विभागाने वैरण विकास योजनेअंतर्गत वैरणीचा पूरेपूर वापर व्हावा यासाठी सन २०१२ ते २०१५ मध्ये एकूण २३१ कडबाकूट्टी यंत्र व राष्ट्रीय पशुधन अभियाना अंतर्गत ५२ कडबाकूट्टी यंत्राचे वाटप करण्यात आले आहे.

चारा टंचाईवर मात करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने सन २०१३-२०१४ मध्ये ६९ मुरघास युनिटची स्थापना नांदेड जिल्हयामध्ये केलेली आहे.

नांदेड जिल्हयात लागवड क्षेत्र व राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत गतीमान वैरण विकास कार्यक्रमांतर्गत चारा प्रात्यक्षिकाद्वारे १०,६२,१९९ मेटर चारा उत्पादन झाले असून मे २०१५ अखेर १.६५ मे टन चारा शिल्लक होता. त्यामुळे शासनाने हाती घेतलेल्या चारा उत्पादन वाढीसाठीच्या विविध उपाययोजनांमुळे अधिकचा चारा उत्पादन वाढीसाठीच्या विविध उपाययोजनांमुळे अधिकचा चारा उपलब्ध होऊन चा-याची गरज भागविण्यास मदत झाली आहे. सन २०१५-१६ करिताही तजवीज करण्यात आली आहे.

-----------------

## मुंबई शहर व उपनगरात मुदत संपलेल्या टॅक्सी व रिक्षा भंगारात जमा करण्याबाबत

**(४७) * ९२६५ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरात मुदत संपलेल्या काळ्या-पिवळ्या टॅक्सी व रिक्षा भंगारात जमा करण्याबाबत घेतलेल्या निर्णयानुसार माहे जून, २०१५ मध्ये वा त्यासुमारास किती टॅक्सी व रिक्षा या भंगारात जमा करण्यात आलेल्या आहेत,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) मुदत संपलेल्या टॅक्सी व रिक्षा भंगारात काढण्याच्या निर्णयानुसार मुंबई महानगर परिवहन प्राधिकरण क्षेत्रातील २० वर्षावरील टॅक्सी व १६ वर्षावरील ऑटोरिक्षा परवान्यावरुन उतरविण्यात येत आहेत.

अशा ऑक्टोरिक्षा पुन्हा दुरुस्त करुन त्याच क्रमांकावर अनधिकृतपणे चालविण्यात येत असल्याबाबत येणाऱ्या तक्रारींमुळे अशा ऑटोरिक्षा भंगारात काढण्याचे काम क्षेत्रिय परिवहन कार्यालयात करण्यात येते.

त्यानुसार माहे जून २०१५ मध्ये मुंबई (मध्य), मुंबई (पश्चिम) व मुंबई (पूर्व) अशा तीन विभागांत मिळून एकूण ६१८ ऑटोरिक्षा व २६१ टॅक्सी भंगारात काढण्यात आल्या आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पशुसंवर्धन विभागातील गट अ दर्जाच्या ३८९ अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्याबाबत**

**(४८) * ९६२० श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पशुसंवर्धन विभागातील गट अ दर्जाच्या ३८९ अधिकाऱ्यांच्या बदल्या उपसचिवांनी त्यांचे सचिव, मा.राज्यमंत्री आणि मंत्र्यांना कोणतीही सूचना न देता करण्यात आल्याची बाब माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उपसचिवांनी आयुक्तांच्या सहमतीने यापूर्वीही अशा प्रकारच्या बदल्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब (१) व (२) नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या प्रकरणात दोषी आढळणाऱ्या व्यक्तींविरुध्द शासन कोणती कठोर कारवाई करणार आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, कारवाईस होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

पशुसंवर्धन विभागातील पशुधन विकास अधिकारी गट-अ दर्जाच्या ३८९ अधिकाऱ्यांच्या बदल्यांबाबत नागरीसेवा मंडळाची मान्यता घेऊन तसेच सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने बदली आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील हर्णे गावातील दाभोळ टेमकरवाडीत डोंगर कोसळून पाच व्यक्तींचा झालेला मृत्यू**

**(४९) * १०७८३ श्री.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील हर्णे गावात दिनांक १८ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास पहाटे तीनच्या सुमारास दाभोळ टेमकरवाडीत डोंगर कोसळून तीन घरांतील पाच व्यक्तींचा झोपेतच मृत्यु झाल्याची दुर्घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, या दुर्घटनेतील मृतांच्या नातेवाईकांना तसेच गावातील नुकसानग्रस्तांना शासनाने मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्‌याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय,

(२) होय,

(३) नैसर्गिक आपत्ती संदर्भात शासनाच्या स्थायी आदेशानुसार मृतांच्या नातेवाईकांना तसेच गावातील नुकसानग्रस्तांना मदत देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोदिया, अमरावती, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली व अकोला येथे औष्णिक विद्‌युत प्रकल्प मंजूर करण्याबाबत**

**(५०) * ९७८५ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोदिया, अमरावती, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली अकोला येथे मागील वर्षी केंद्र शासनाकडून ८४,५३७ मेगावॅट १३२ के.व्ही. चे औष्णीक विद्‌युत प्रकल्प मंजूर करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पांपैकी किती औष्णीक विद्‌युत प्रकल्प सुरु झाले व ते कोणकोणत्या नदीवर सुरु करण्यात आले, वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) केंद्र शासनाच्या विद्‌युत अधिनियम २००३ नुसार वीज निर्मिती क्षेत्र परवानामुक्त करण्यात आले असल्याने औष्णिक वीज निर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी केंद्र शासन/राज्य शासनाची मंजूरी घेण्याची आवश्यकता नाही. वस्तुतः प्रस्तुत प्रश्न हा केंद्र शासनाशी संबंधित असल्याचे दिसून येते.

राज्य शासनाकडून मागील वर्षी विदर्भात महानिर्मिती कंपनीचा कोणताही औष्णिक विद्‌युत प्रकल्प मंजूर करण्यात आला नाही.

-----------------

**पशुसंवर्धन विभागातील पशुवैद्‌यकीय सेवेतील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(५१) * ९९३० डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ५७०४ ला दि.२४ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पशुसंवर्धन विभागातील पशुवैद्यकीय सेवेतील एकूण १०८४ रिक्त पदे भरण्याची शासनस्तरावरील तसेच आयुक्त, पशुसंवर्धन यांचे स्तरावर सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, पशुसंवर्धन विभागात रिक्त असलेली पशुधन विकास अधिकाऱ्यांची ३७२ पदे भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे सादर केलेल्या मागणी पत्रानुसार आयोगाकडून पात्र उमेदवारांची यादी शासनास प्राप्त झाली आहे काय,
(३) असल्यास, गट 'अ', गट 'ब', गट 'क', व गट 'ड', संवर्गातील रिक्त पदे भरण्यात आली आहेत काय,
(४) असल्यास, सदरहु रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) पशुसंवर्धन विभागातील पशुवैद्यकीय सेवेतील एकूण १०८४ पदे रिक्त नसून ९७० पदे रिक्त आहेत.

त्यापैकी सहा.आयुक्त पशुसंवर्धन या पदाच्या पदोन्नतीने नियुक्तीची ८७ पदांपैकी ७१ पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही शासनस्तरावरुन सुरु आहे. तसेच पशुधन विकास अधिकारी गट-अ या पदासाठी ३०० शिफारस पात्र उमेदवारांपैकी साक्षांकन नमुने प्राप्त झालेल्या २९६ उमेदवारांच्या नियुक्तीची कार्यवाही शासन स्तरावरुन प्रगतीत आहे.
(२) होय.

३०० उमेदवारांची गुणवत्ता यादी प्राप्त झालेली आहे.
(३) व (४) पशुसंवर्धन विभागात पशुधन विकास अधिकारी गट-अ संवर्गाची पदे भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या ३०० शिफारसपात्र उमेदवारांपैकी साक्षांकन नमुने प्राप्त झालेल्या २९६ उमेदवारांची वैद्यकीय तपासणी व पूर्व चारित्र पडताळणी करुन त्यांना पदस्थापना देण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

गट-ब, गट-क व गट-ड च्या पदावरील नियुक्तीची कार्यवाही आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयाकडून करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कसबे (ता.तासगांव, जि.सांगली) येथील महार समाजाच्या महार वतनाच्या जमिनीबाबत**

**(५२) * ९९७९ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कसबे (ता.तासगांव, जि.सांगली) येथील समस्त महार समाज, तासगांव यांच्या महार वतनाच्या सामुहिक मालकीच्या स.न.९५ व ९६/८ या जमिनींना कुळवहिवाट कायदा ३२-ग लागू होत नसल्याचा सुस्पष्ट न्यायनिवाडा महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, पुणे यांनी दिनांक २४ जानेवारी, २०१४ रोजी दिला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची अंमलबजावणी न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त ठिकाणच्या महार वतनी जमिनी संबंधितांच्या नावे त्वरीत करण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, याबाबतची शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) नगर परिषद हद्दीतील शेतजमिनीस महाराष्ट्र शेत जमीन व कूळवाहिवाट अधिनियमातील कलम ३२ ते ३२ र च्या तरतुदी लागू होत नाहीत. त्यामुळे प्रश्नांकित जमिनीबाबत तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण, तासगांव यांनी कुळांची कलम ३२ ग अनुसार किंमत ठरविण्याविषयी केलेला अर्ज नामंजूर करण्याचा आदेश दिला आहे. सदरचा आदेश उपविभागीय अधिकारी, मिरज व महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने कायम केला आहे. त्यामुळे प्रश्नाधीन जमिनीवरील अस्तित्वात असलेल्या कुळांना कलम ३२ ग अन्वये किंमत ठरवून मालकी हक्काचे प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही व प्रश्नांकित जमिनीचे अधिकार अभिलेखात मूळ कब्जेदारांची नांवे पूर्ववत ठेवण्यात आली आहेत. महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने सदर प्रकरणी कूळांचे नोंदी कमी करण्याचे आदेशीत केलेले नाही. प्रश्नाधीन जमिनीवरील कूळांनी मा.दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला असून प्रकरण न्याय प्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मालवण तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळणेबाबत

**(५३) * १०५८४ श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालवण तालुक्यात दिनांक १८ मे, २०१५ रोजी वा त्यादरम्यान वादळी वाऱ्यासह विजेच्या लखलखाटाने धामापूर परबवाडी येथील शामसुंदर परब यांच्या गोठयावर कोसळलेल्या विजेमुळे २ बैल, १ गाय होरपळून मेली व स्वत: शामसुंदर परब हे गंभीररित्या जखमी झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकरी श्री.परब यांना कोणत्या प्रकारची आर्थिक मदत करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच नुकसान भरपाई दिली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

दिनांक ९ मे, २०१५ रोजी मालवण तालुक्यात मौजे धामापूर परबवाडा येथील श्री शामसुंदर परब यांच्या मांगरावर वीज पडून लागलेल्या आगीत ३ मोठी जनावरे मृत झाली असून, १ जनावर जखमी झाले आहे.

श्री.शामसुंदर परब हे गंभीर जखमी झाल्याचे दिसून आले नाही.

मृत जनावराच्या मालकास निकषानुसार रु. ७५,०००/- इतके सानुग्रह अनुदान वाटप करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यातील तहसिलदार यांनी ५०० एकर जमीन बेकायदेशीरपणे खाजगी व्यक्ती व बांधकाम व्यवसायीकांच्या नावे केल्याबाबत**

**(५४) * ९०२७ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात इंधन वाचविण्याच्या मोहिमेद्वारे चर्चेत आलेले नांदगावचे तहसिलदार सुदाम महाजन यांनी नांदगाव तालुक्यात इनाम वतन व शर्तीच्या जमिनीबाबत अधिकार नसतानाही राज्य सरकारच्या अटी-शर्तीच्या प्रकारातील सुमारे ५०० एकर जमीन खाजगी व्यक्ती व बांधकाम व्यावसायिकांच्या घशात घातल्याचे दिनांक १९ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाजन यांनी विभागीय आयुक्तांच्या अधिकारात हस्तक्षेप करून नियम-निकष डावलून शासनाचे सुमारे सव्वा तीन कोटी रुपयांचे नुकसानही केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी दोषी असणा-या तहसिलदारावर शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(४) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) प्रश्नाधिन प्रकरणी अपर जिल्हाधिकारी, मालेगांव यांनी अधिकारबाह्यरित्या काही प्रकरणात नवीन शर्तीच्या भोगवटादार वर्ग-२ च्या शेतजमिनींच्या खरेदी-विक्रीस परवानगी दिल्याचे निदर्शनास आले आहे. चौकशीतील निष्कर्षाच्या आधारे अपर जिल्हाधिकारी, मालेगांव यांनी संबंधित जमीनी सरकार जमा करण्याबाबत आदेश पारित केले आहेत. तसेच या प्रकरणाशी संबंधीत श्री. सुदाम महाजन, तत्कालीन तहसिलदार, नांदगांव जि. नाशिक, सध्या नियुक्ती तहसिलदार, सुरगाणा, जि.नाशिक, यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम ४(१)(अ) नुसार, शासन आदेश दि. ०७/०७/२०१५ अन्वये निलंबित करण्यात आले असून, त्यांचया विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ अन्वये विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात येत आहे. या प्रकरणाशी संबंधित अन्य अधिकारी/कर्मचारी यांची देखिल जबाबदारी निश्चित करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## पुणे येथील स्वारगेट बस स्थानकांवर मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत

**(५५) * १०६२२ श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या स्वारगेट बस स्थानकांवर मुलभूत सुविधा पुरविण्यात आल्या नसल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वारगेट बस स्थानकावर पाणी इत्यादी मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही.

(२) स्वारगेट येथे २ बसस्थानके कार्यान्वित असून मुख्य बसस्थानकामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी पाणपोई आहे. तसेच प्रवाशांना प्रतिक्षालय बसण्यासाठी स्टेनलेस स्टील खुर्च्या चौकशी कक्ष, प्रवाशांच्या माहितीसाठी संगणकीय उद्घोषण, सुलभ पध्दतीचे प्रसाधनगृह, लाईट, पंखे व वाणिज्य आस्थापना अंतर्गत प्रवाशांना उपयुक्त विविध वस्तुंच्या/खाद्यपदार्थाच्या आस्थापना इ. मुलभूत सुविधा आहेत. त्याचप्रमाणे बसस्थानकामध्ये सी.सी टीव्ही कॅमेरे व मेटल डिटेक्टर बसविण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुद्रांक शुल्क व रेडीरेकनर दरात केलेला गैरव्यवहार

**(५६) * १०२१२ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जमीन खरेदी विक्रीच्या वेळी जुन्या दराने मुद्रांक शुल्क वसूल करुन शासनाची फसवणूक करणे तसेच बाजारमुल्याच्या तुलनेत कमी दराने खरेदी विक्री व्यवहार करणे असे प्रकार करणा-या परभणी सह औरंगाबाद येथील सहजिल्हा निबंधक व उपनिबंधक यांच्या कारभाराची चौकशी करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी मुद्रांक शुल्क विभागाच्या महानिरीक्षक, पुणे यांच्याकडे सन २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाची फसवणुक करुन स्वतःचे व ग्राहकाचे हित साधणाऱ्या दोषी अधिका-यांच्या कारभाराची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले तसेच दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, अद्यापपर्यंत कारवाई न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) व (३) औरंगाबाद शहरातील दुय्यम निबंधक, औरंगाबाद क्र.१ ते ६ या कार्यालयात नोंदणीकृत झालेल्या ९ गांवातील दस्तांची विशेष पथकाने तपासणी केली असता एकूण ७२९ दस्तांमध्ये रुपये १,७७,०५,९४०/- इतका मुद्रांक शुल्क व नोंदणी फी ची कमी आकारणी केल्याचे निदर्शनास आले. सदर दस्तांची नोंदणी करणारे तत्कालीन दोन सह दुय्यम निबंधक यांना निलंबित करण्यात आले आहे. व दोन दुय्यम निबंधक यांना विभागीय चौकशीचे अधिन राहून दिनांक ३१/०८/२०१४ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करण्यात आले आहे. परभणी जिल्ह्यातील परभणी, सोनपेठ, सेलू, पुर्णा व गंगाखेड येथील खरेदी विक्री व्यवहारांची तपासणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना खरीपाचे अनुदान वाटप होत नसल्याबाबत

**(५७) * १०२३५ श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्याच्या दुष्काळग्रस्त गावातील ७,२०,५५० शेतकऱ्यांना खरीपाचे पीक वाया गेले म्हणून शासनाने ३१५.८३ कोटी रुपये अनुदान मंजूर केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने अनुदानाची रक्कम जिल्हा प्रशासनाकडे वर्ग करुनही माहे जून, २०१५ अखेर जिल्ह्यातील २,२७,३८४ शेतकऱ्यांचे अनुदान महसूल प्रशासनाकडून बँकेकडे वर्ग झालेले नाहीत तर उर्वरित ४,९३,१६६ शेतकऱ्यांच्या नावे २२१.५८ कोटी रुपये बँकेकडे वर्ग होऊनही अद्याप लाखो शेतकऱ्यांना हे अनुदान वाटप झाले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने मंजूर केलेले अनुदान वाटप करण्यासाठी झालेल्या विलंबाची चौकशी करुन दोषीविरुध्द शासन कारवाई करणार आहे काय,

(४) असल्यास, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मंजूर अनुदानाची रक्कम तात्काळ वाटप करण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे,

(५) दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना अनुदानाचे वाटप करण्यासाठी झालेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे.

(२) माहे मार्च-२००५ अखेर ज्या शेतकऱ्यांचे बँक खाते उपलब्ध झाले त्या शेतक-यांचे नांवे खाते क्रमांकाच्या यादीसह देयक आहरण करुन रु. २२१,५८,६७,५२०/- इतका निधी ४९२७३१ बाधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यासह बँकेकडे वर्ग करण्यात आला आहे. तथापि जिल्ह्यास २२८४८८ शेतकऱ्यांचे माहे मार्च-२०१५ अखेर विविध कारणावरुन खाते क्रमांक उपलब्ध न झाल्याने त्यांचे ३१ मार्च पूर्वी देयके कोषागारातून आहरण करता आलेली नाहीत. अशा उर्वरित २२८४८८ शिल्लक शेतकऱ्यांसाठी तहसिलदार यांचे मागणीवरुन रु. ९४,२४,४८,७४१/- इतक्या निधीची नव्याने मागणी करण्यात आलेली आहे.

बँकेकडे वर्ग केलेला निधी संबंधित शेतकऱ्यांचे खात्यावर जमा करण्यात आलेला आहे. शेतकरी त्यांचे सोयीप्रमाणे रक्कम उचल करीत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) मंजूर करण्यात आलेले अनुदान बँकेकडे वर्ग करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात पीक विम्याचे नियम बदलून आता सर्वकक्ष**
**पीक विमा योजना लागू करण्याबाबत**

**(५८) * ९९४१ श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अवकाळी पाऊस आणि गारपीट यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होऊन शेतकऱ्यांची परिस्थिती गंभीर झाल्याने राज्यात पीक विम्याचे नियम बदलून आता सर्वकष पीक विमा योजना लवकरच लागू करण्यात येत असल्याची घोषणा मा.महसूल व कृषी मंत्री यांनी मंगरुळपीर, जि.वाशिम येथे दिनांक १० मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे सर्वसाधारण निकष व स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सर्वकष पीकविमा कधीपासून राज्यात लागू करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, सदर योजना राज्यात लागू करण्यास शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) दिनांक १०.०५.२०१५ रोजी मंगरुळपीर, जि.वाशिम येथे नवीन पीक विमा योजना धोरण ठरविण्याची बाब केंद्र शासनाच्या विचाराधीन असल्याचे सांगितले, हे खरे आहे.

(२) व (३) योजना अद्याप जाहिर नसून केंद्र शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) तूर्त कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्ह्यातील राज्य परिवहन मंडळ तोट्यात येत असल्याबाबत**

**(५९) * ९२८२ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील हात दाखवा गाडी थांबवा या उपक्रमाकडे वाहक चालकाकडून दुर्लक्ष केले जात असल्याने राज्य परिवहन मंडळाला तोटा येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार हात दाखवा बस थांबवा या परिवहन उपक्रमाकडे दुर्लक्ष करणा-या वाहक चालकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) राज्य परिवहन महामंडळाने १९९७-१९९८ मध्ये प्रवाशांच्या सुविधेसाठी जनता सेवा हा नवीन सेवा प्रकार कार्यान्वित करुन सदर सेवेच्या बसेसना हात दाखवा गाडी थांबवा असे फलक लावण्यात आले. मात्र २०१० पर्यंत सदर उपक्रम राबवूनही त्यास योग्य प्रवासी प्रतिसाद न मिळाल्यामुळे जनता सेवेची नियते व फे-यांचे रुपांतरण साध्या सेवेत करण्यात आले व जनता सेवा बंद करुन हात दाखवा बस थांबवा उपक्रम बंद करण्यात आला.

सदर उपक्रम बंद झाल्यामुळे प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी विनंती थांब्यावर प्रवासी चढ-उतार करण्यात येते. याशिवाय विशेषतः ग्रामीण प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी प्रवाशांनी विनंती केल्यास मार्गावर प्रवासी चढ-उतार करण्याच्या सूचना चालक व वाहकांना देण्यात आल्या आहेत.

यवतमाळ विभागाचा तोटा वर्ष २०१४-२०१५ मध्ये वर्ष २०१३-२०१४ च्या तुलनेत रुपये ३५८.९५ लाखाने कमी झालेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------------------

**सोलापूर जिल्हयातील कुटूंबांना वीज पुरवठा करण्याबाबत**

**(६०) * ८७०८ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हयातील ५०० गावांतील १७ हजार ७४४ घरे पैसे भरल्यानंतरही वीज वितरण कंपनीच्या निष्क्रीय कामगीरीमुळे दहा तासांपेक्षा जास्त वेळ भारनियमन केल्याने अंधारात राहिली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाना प्राधान्याने घरगुती वीजपुरवठा करण्याचा नियम असतानाही तब्बल पाच हजार बीपीएल धारक कुटुंबाना वीज अद्याप मिळाली नसल्याने ही कुटुंबे अजूनही अंधारात राहिली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गावे भारनियमन मुक्त करून अंधारात असलेल्या येथील कुटुंबाना तातडीने वीज पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे अंशत: खरे आहे. मे, २०१५ रोजी १२२३७ इतके ग्राहक पैसे भरुन वीज जोडण्यासाठी प्रलंबीत आहेत.

(२) हे खरे आहे. ४८३५ दारिद्र्यरेषेखालील लाभार्थ्यांना वीज मिळाली नसून, त्यांना तातडीने वीज जोडण्या देण्याची कामे दीनदयाल उपाध्याय ग्रामज्योती योजनेमध्ये समाविष्ठ करण्यात आलेली आहेत.

(३) सोलापूर जिल्ह्यातील कुटुंबांना वीज पुरवठा देण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे अधिक वितरण वाणिज्य हानी असलेल्या वाहिन्यावर वीज बील वसूली वाढविण्याची व चोरी शोधण्याची मोहिम युध्द पातळीवर हाती घेतली आहे. त्यामुळे, वाहिन्यांची वितरण व वाणिज्य हानी कमी होण्यास मदत होत आहे. वितरण व वाणिज्य हानी कमी झालेल्या वाहिन्यांचे भारनियमन अंशत:/पूर्णत: कमी करण्यात आले आहे. वीजेची उपलब्धता चांगली असल्यास, ज्या वाहिन्यांवर भारनियमन चालू आहे अशा वाहिन्यांवरीलसुध्दा भारनियमन टप्प्याटप्प्याने मागे घेण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बोर्डी (जि.पालघर) परिसरातील गाव-पाडयांमधील**
**धोकादायक वीज खांबाबाबत**

**(६१) * १०७९२ श्री.आनंद ठाकूर, श्री.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोर्डी (जि.पालघर) परिसरातील गाव-पाडयांमध्ये गंजलेले वीज खांब, जीर्ण झालेल्या तारा व धोकादायक ट्रान्सफॉर्मर आदिमुळे वीजयंत्रणा धोकादायक ठरली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक ग्रामस्थांनी वीज कार्यालयाकडे अनेकवेळा तक्रारी करुनही याकडे दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बाब क्र. १ व २ नुसार शासनाने याची चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त परिसरातील वीज यंत्रणा तात्काळ दुरुस्तीकरिता शासन कोणती कार्यवाही वा उपाययोजना करणार वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, कार्यवाहीस होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही. स्थानिक ग्राहकांच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर काही कामे पायाभूत आराखडा-१ योजनेअंतर्गत झालेली आहेत. उर्वरीत कामे U & M योजनेमध्ये अंर्तभूत केलेली असून, सदर कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) १ व २ ची दखल घेण्यात आली आहे.

(४) सदर गंजलेले वीजखांब जीर्ण झालेल्या तारा, धोकादायक ट्रान्सफॉर्मर बदलण्याची कामे पायाभूत आराखडा-१ योजनेअंतर्गत झालेली आहेत. उर्वरित कामे U & M योजनेमध्ये अंर्तभूत केलेली असून सदर कामे प्रगतीपथावर आहेत. या शिवाय बोर्डी गावाच्या परिसरामधील समुद्रकिनाऱ्यालगत असणाऱ्या वीज वाहक तारा भूमिगत करण्यासाठी (National Cyclone Risk Mitigation Project) सुमारे २० कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**श्रीगोंदा तालुक्यात नामांकीत कंपनीच्या नावाखाली बोगस बियाणाची विक्री सुरु असल्याबाबत**

**(६२) * १०७८४ श्री.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा तालुक्यात नामांकीत कंपनीच्या नावाखाली बोगस बियाणाची विक्री होत असल्याची घटना माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने आतापर्यंत याप्रकरणात दोषी आढळलेल्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, कारवाईस होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) स्थानिक वर्तमानपत्र “आपले महानगर” मध्ये बोगस बियाण्याची विक्री होत असल्याबाबतची बातमी दि. १३/०६/२०१५, दि. २४/०६/२०१५ व दि. ३०/०६/२०१५ रोजी प्रसिध्द झालेली होती.

(२) बातमी मोघम स्वरुपाची असल्यामुळे स्वतंत्र चौकशी करण्यात आलेली नाही. तथापि, गुणवत्ता नियंत्रणासंदर्भात नियमीत तपासणीत बोगस बियाणे विक्रीची घटना घडल्याचे अथवा तशा प्रकारची तक्रार प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात अवकाळी पावसामुळे शेतीचे व फळांचे मोठया प्रमाणात झालेले नुकसान

**(६३) * ९९३१ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ५२६२ ला दिनांक २४ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१४ या कालावधीत अवकाळी पाऊस, वादळी वारा व गारपीट यामुळे शेती पिके व फळपिकांचे ५० टक्केपेक्षा जास्त नुकसान होऊन त्यात १३ जिल्ह्यातील एकुण १६५९९ हेक्टर क्षेत्रावरील पिकाचे नुकसान झाले, खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक, मालेगांव, निफाड, कळवण, चांदवड, दिंडोरी व सटाणा येथे झालेल्या गारपीट व अवकाळी पावसामुळे हजारो हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याच्या विचाराधिन बाबींवर शासनाचा विचार पुर्ण होऊन प्रत्यक्ष मदतीचे वाटप करण्यात आले आहे काय,

(४) नसल्यास, सदरील मदतीचे केव्हापर्यंत वाटप होणे अपेक्षित आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) होय.

(३) जुलै ते ऑक्टोबर, २०१४ या कालावधीत नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिके व फळपिकांच्या ५०% पेक्षा अधिक नुकसान झालेल्या क्षेत्रास मदत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. त्यामध्ये नाशिक जिल्ह्यातील बाधित क्षेत्राचा समावेश आहे.

नोव्हेंबर-२०१४ मधील अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेतीपिके व फळपिकांच्या ५०% पेक्षा जास्त नुकसान झालेल्या क्षेत्रास विशेष दराने मदत देण्याचा निर्णय दिनांक ४ फेब्रुवारी, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने रुपये ८६.१० कोटी इतका निधी राज्याकरीता वितरीत करण्यात आलेला आहे.

(४) वितरीत करण्यात आलेल्या निधीपैकी रुपये ७०.८१ कोटी इतके अनुदान राज्यातील शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आलेले आहे. त्यापैकी नाशिक जिल्ह्यात रुपये ५५.१५ कोटी इतके अनुदान शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आलेले आहे.

-----------------

**अनधिकृत बनावट मद्याची वाहतुक रोखून निर्बंध घालण्याबाबत**

**(६४) * १०७०० प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक १९ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास १ कोटी ४४ लाख रुपये किंमतीची गोवा बनावटीची विदेशी मद्य वाहतूक करणारा ट्रक लांजा-साखरपा मार्गावरील तळवडे रेल्वे पुलाखाली पकडण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, अनधिकृत बनावट मद्याची वाहतुक रोखण्यासह त्यावर निर्बंध घालण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) होय.

(३) संबंधितांविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५ (अ) (ई), ८१,८३,९० व १०८ अन्वये गुन्हा नोंद करुन एका आरोपीस अटक करण्यास आली आहे. तर एक आरोपी फरार असून त्याचा शोध घेण्यात येत आहे.

(४) राज्य उत्पादन शुल्क विभागाचे १२ तपासणी नाके कार्यरत असून याशिवाय ३८ जिल्हास्तरीय भरारी पथके, ६ विभागीय भरारी, पथके, १ राज्यस्तरीय भरारी पथकामार्फत तसेच पोलीस विभागामार्फत अनधिकृत बनावट मद्याची वाहतुक रोखण्यावर, विक्री यावर नियंत्रण ठेवण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**

**मुंबई.** **सचिव,**

**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.